शनिवार, १७ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 17 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | •YEAR-03 •ISSUE-179 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-12 •PRICE-05

## मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ राजूर येथे मराठा समाज आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले असून मागील सहा दिवसापासून अन्न-पाण्याचा त्याग करून वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत चालली असून वेळीच लक्ष न दिल्यास त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.म्हणून झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी व मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ राजूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने रास्तारोको करून सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला. सकाळी दहा वाजेच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाज एकत्रित जमला होता.यावेळी समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय जिजाऊ जय शिवराय, एक मराठा ,लाख मराठा अशा घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सरकारच्या विरोधात तीव्र भावना व्यक्त केल्या. सरकारने वेळखाऊपणा करून मराठा समाजाचा विश्वासघात केला आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. जीवाला काही धोका झाल्यास पुढाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशारा सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला. मराठा आरक्षणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लागावावा.अन्यथा पुन्हा एकदा मराठा समाज आपल्या न्यायहक्कांसाठी रस्त्यावर उतरेल. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहणार असल्याचे म्हटले आहे.शेवटी सकल मराठा समाजाच्या वतीने हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय आहेर,महसूल विभागाचे कर्मचारी अरुण चव्हाण निवेदन देण्यात आले. रास्तारोकोमुळे मुख्य रस्त्यावर दूरवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी कैलास पुंगळे, अण्णासाहेब भालेराव, गजानन नागवे, ज्ञानेश्वर पुंगळे, भगवान ठोंबरे, साहेबराव ठोंबरे, सुदाम ढवळे, कारभारी टेपले, नामदेव पुंगळे, सचिन फटाले, सचिन सावंत, विनोद पुंगळे, उमेश पुंगळे, विठ्ठल शेजुळ राजू पठाण, राहुल नागवे, प्रभू कढवणे, मुकुंद झुंबड, सोपान नागवे, समाधान नागवे, राजेश ठोंबरे, राजेंद्र पुंगळे, उद्धव थोटे, सतीश थोटे, उन्हाळे, एकनाथ शिंदे, कैलास ढवळे, ज्ञानेश्वर नागवे, प्रशांत सोनवणे, गोविंद पडघम यासह अनेक मराठा बांधव उपस्थित होते.



'मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मागील सात दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे .अन्न व पाण्याचा त्याग करून उपचारास नकार दिला आहे .प्रकृती चिंताजनक असल्याने काळजी वाटते . सरकार मुद्दाम वेळखाऊपणा करत आहे .अद्यापही सरकारचे शिष्टमंडळ उपोषणाकडे फिरकले नाही . जाणूनबुजून याकडे दुर्लक्ष करत आहे .मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीचे बरेवाईट झाल्यास नेत्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही असा आक्रमक पवित्रा मराठा समाजाने घेतला आहे .'

## २०१४ च्या गॅरंटीचे काय झाले ?

### खरगे : लोणावळ्याच्या शिबिरात सरकारच्या निषेधाचे ठराव



आधुनिक केसरी न्यूज

**लोणावळा : पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच मोदीची गॅरंटी, मोदीची गॅरंटी असे बोलत असतात, त्यांच्या बोलण्यात मी, मी पणा जास्त असतो. आपण 'आम्ही भारताचो लोक' असे म्हणतो परंतु मोदी मात्र मी, मी असेच करतात. नरेंद्र मोदी सातत्याने खोटे बोलत असतात, ते खोट्यांचे सरदार आहेत. मोदींनी आजपर्यंत दिलेली एकही गॅरंटी पूर्ण केली नाही. २०१४ मध्ये मोदींनी काळा पैसा आणून प्रत्येकाला १५ लाख रुपये प्रत्येकाला देण्याची, दरवर्षी २ कोटी नोकरी देण्याची, शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करू, या गॅरंटी दिल्या होत्या या मोदी गॅरंटीचे काय झाले? असा सवाल काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केला आहे.**

लोणावळ्यात आयोजित केलेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबीराचे उद्‌घाटन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी ऑनलाईन केले. यावेळी ते बोलत होते. खरगे पुढे म्हणाले की, काँग्रेसप्रणित युपीए सरकारने २००४ ते २०१४ याकाळात अन्न सुरक्षा कायदा आणला, रोजगार हमीचा मनरेगा कायदा केला, सर्व शिक्षा अभियान आणले, माहिती अधिकार कायदा आणला. मोदी सरकारने दहा वर्षात काहीही दिलेले नाही. नरेंद्र मोदी, भाजपा, आरएसएसने देशाला स्वातंत्र दिलेले नाही.

काँग्रेस पक्ष, महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, लोकमान्य टिळक या महान नेत्यांनी देशाला स्वातंत्र मिळवून दिले. स्वातंत्र्य चळवळीत भाजपाचे काहीच योगदान नाही. काँग्रेस पक्षाचा जन्म मुंबईत झाला आहे, आज या पक्षाला १३९ वर्ष झाली आहेत. काँग्रेस पक्ष खोटे बोलणारा पक्ष नाही. लोकांच्या हितासाठी व स्वातंत्र्यासाठी या पक्षाचा जन्म झाला आहे. समाजात फुट पाडण्यासाठी काँग्रेस पक्ष नाही. एकता व सामाजिक सौहार्द जपणारा पक्ष आहे. मुंबईकडे देशाचे लक्ष लागलेले असते, मुंबई व पुणे शहराने सामाजिक सौहार्दाचे काम केले आहे. आपली लढाई मोदी व भाजपाविरोधात आहे तशीच ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स या संस्थाविरोधातही लढाई करावी लागत आहे. निवडणुकीसाठी घराघरात जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवा. या निवडणुकीत सर्वांनी हिरीरीने भाग घेत एकजूट होऊन निवडणुका लढा द्या व काँग्रेसला विजयी करा. प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला मार्गदर्शन करताना म्हणाले की, महाराष्ट्रातील वातावरण काँग्रेस पक्षासाठी अनुकुल आहे. सर्व राज्याचा दौरा करून आढावा घेतल्यानंतर आता शिबीर घेतले जात आहे. महाविकास आघाडी राज्यातील लोकसभेच्या सर्व ४८ जागा लढवत आहेत. आजचे राज्यातील वातावरण पाहता मविआ सर्वात जास्त जागा जिंकेल. केंद्र सरकारने काँग्रेस पक्षाची सर्व बँक खाती गोठवली आहेत. निवडणुकीच्या तोंडावर भाजपा कोणत्याही थराला जाईल परंतु काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकजुटीने लढून विजय मिळवावा, असे आवाहन रमेश चेन्नीथल्ला यांनी केले. केंद्र सरकारकडून लोकशाही आणि संविधानाचा गळा दाबण्याचा प्रकार सुरू असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दडपशाहीचा निषेध केला. तसेच माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजप सरकार विरोधात मांडलेले ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

## नांदुरा तालुक्यात गारपिटीमुळे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** नांदुरा तालुक्यातील ग्राम वाडाळी, वडगांव, धानोरा, वसाडी, वळती यांसह आजूबाजूच्या गावांत १५ फेब्रुवारी रोजी रात्री वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे गहू, मका, कांदा, हरभरा,ज्वारी व फळबाग यांसह जवळपास सर्वच शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या चक्री वादळामुळे व गारपिटीने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. आधीच शेतकरी कर्जाच्या बोझ्याखाली दबलेला असून शेतमालाला भाव नसल्याने संकटात सापडला आहे. अशातच निसर्गाच्या लहरीपणामुळे काल झेलेल्या चक्री वादळाचा व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे पूर्ण पीक झोपून गेले यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून दिरंगाई न करता आर्थिक मदत द्या, अशी मागणी आज १६ फेब्रुवारी रोजी संभाजी ब्रिगेड नांदुराच्या वतीने नांदुरा तहसीलदार यांच्याकडे केली असता तहसीलदार साहेबांनी तात्काळ संमधित अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.तरी शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे अमर पाटील यांनी सांगितले. यावेळी संभाजी ब्रिगेड बुलढाणा जिल्हाध्यक्ष योगेश पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष मंगेश सोळंके,नांदुरा तालुकाध्यक्ष अमर रमेश पाटील, तालुका उपाध्यक्ष दिलीप कोल्हे, संभाजी ब्रिगेड कायदेतज्ञ ॲड.पवन चव्हाण साहेब, पत्रकार योगेश धोटे, विजय निवृत्ती पाटील, मार्गदर्शक विनोद वनारे,संजय पाटील, रुपेश पवार, सोपान मुंडे, शिवहरी कोल्हे,अक्षय जूनारे,भागवत वेरुळकार,विशाल इंगळे, सुरेंद्र हेलगे, भगीरथ मनस्कार, श्रीकृष्ण मनस्कार व शेतकरी उपस्थित होते.

## ऑस्ट्रियाची युवती झाली चंद्रपूरची सून! बैलबंडीतून वरात

### लग्नासाठी नऊ देशांतील वऱ्हाडींची उपस्थिती


आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सावली तालुक्यातील दाबगाव मौशी येथील उच्चशिक्षित युवकाचा युरोपातील ऑस्ट्रिया देशातील युवतीशी प्रेमविवाहसोहळा नुकताच संपन्न झाला. युवतीला थेट गावात आणून बैलबंडीतून वरात काढत अतिशय साध्या पद्धतीने विवाह केला. या अनोख्या प्रेमविवाह सोहळ्याची चर्चा जिल्ह्यातभरात होत असून चित्रफिती समाज माध्यमावर प्रचंड व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे, या विवाह सोहळ्याला अमेरिका, स्पेन, दक्षिण आफ्रिका, फिलिपीन्स, नेदरलॅन्ड, ऑस्ट्रियासह नऊ देशांतील वधूचे आप्तेष्ट सहभागी झाले होते. आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या सुकरू पाटील आभारे यांचा एकुलता एक मुलगा हेमंत उच्च शिक्षित असून विदेशातील एका कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत आहे. त्याचे ऑस्ट्रिया देशातील युडीश हरमायनी प्रित्झ, रा. बियेना ऑस्ट्रिया या युवतीशी प्रेमसंबंध जुळून आले. दरम्यान, दोघांनीही लग्न करण्याचे ठरवल्यानंतर त्यांनी थेट आपले गाव गाठले.

आईवडिलांच्या परवानगीनंतर लग्नाची तारीख ठरविण्यात आली. मात्र, गावात समारंभ युक्त सभागृह नसल्याने थेट स्वतःच्या शेतातच लग्न करण्याचे ठरले. कोणताही मंडप किंवा बडेजावपणा न करता शेतातील एका झाडाखाली लग्नविधी सामाजिक रीतिरिवाजाप्रमाणे पार पाडण्यात आला. आधुनिक युगात नावीन्यपूर्ण आणि दिखाऊपणाचा बाज न आणता जुन्या पद्धतीच्या बैलबंडीने वाजतगाजत वरात काढण्यात आली होती. या समारंभाला अमेरिका, स्पेन, दक्षिण आफ्रिका, फिलिपीन्स, नेदरलॅन्ड, ऑस्ट्रियासह नऊ देशांतील वधूचे आप्तेष्ट उपस्थित होते. बैलबंडीने निघालेल्या वरातीत विदेशातून दाखल झालेल्या पाहुण्यांनी डिजे, बॅन्डच्या तालावर नृत्यू, डान्स केला. चंद्रपूरच्या



सावलीतील युवकांने थेट युरोपातील आस्ट्रिया येथील विवाह केल्याने सर्वत्र चर्चेचा विषय ठरला असून या विवाह सोहळ्याच्या चित्रफीत समाजमाध्यमावर सार्वत्रिक झाली आहे. जागतिक प्रेमदिनाच्या दोन दिवस पूर्वीच हा विवाह सोहळा अतिशय आनंदी व उत्साही वातावरणात पार पडला. लग्नपत्रिकेपासून तर मंगलाष्टके, हळद, संगीत व विवाह समारंभातील सर्व आवश्यक कार्यक्रम भारतीय पध्दतीने येथे पार पडले. विदेशी पाहुणे भारतीय पध्दतीने साजरे होणारे लग्न बघून आनंदीत झाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

रोडावत चालली आहे. हिंदी, इंग्रजी या भाषांबद्दल माझ्या मनात आकस नाही रे. पण लहानपणी मुलांना वाढीसाठी आईचंच दूध चांगलं असतं नाही का ? लहानपणी मुलाला आईचं दूध मिळालं तर त्याचा शारीरिक, बौद्धिक विकास निकोप होतो..' साहित्य संमेलनात माझ्या वाढीसाठी खूप काही प्रयत्न होतील अशी मनात आशा ठेवून मी आले होते. तशी माझी अगदीच निराशा झाली नाही. पण कसं होतं ना, घरात मुलाचं लग्न झालं, सून आली की आईची तशी उपेक्षाच होते. तिला आई आई म्हणून म्हटलं जातं . पण घरात होणाऱ्या निर्णयात तिचा फारसा विचार घेतला जात नाही. तसंच काहीसं झालं आहे... '' माझी एक खंत आहे, सांगू का ? '' हो, सांग ना...! मलाही जाणून घ्यायचं आहे. ' ही दरवर्षी जी साहित्य संमेलनं घेतली जातात ना, ती चांगलीच गोष्ट आहे. पण माझा जो वाचक आहे, साहित्याचा आस्वाद घेणारा रसिक आहे त्याचा विचार कोणी करतं का ? मंडळाचे पदाधिकारी आणि राजकीय नेते जसं ठरवतील तसंच संमेलनाचं स्वरूप असतं. सामान्य माणसांचा विचार कुठे असतो त्यात ? मला राजकीय नेत्यांचं वावडं नाही. त्यांनी साहित्य संमेलनात जरूर यावं. पण केवळ एक रसिक म्हणून. व्यासपीठावर सारस्वतांचीच मांदियाळी असावी. संमेलनाची दशा, दिशा त्यांनीच ठरवावी. तुम्ही सगळ्या रसिक वाचकांनी ठरवलंत तर राजकीय नेत्यांची आर्थिक मदत घेण्याची गरज पडणार नाही. मला ते आवडतही नाही. कारण मग मूळ मुद्दे बाजूला राहतात. किरकोळ कारणांवरून हेवेदावे, धुसफूस होते. आरोप होतात. संमेलनाला गालबोट लागते. तुला म्हणून सांगते. जेव्हा व्यासपीठावर कार्यक्रम सुरु होते ना, तेव्हा मी व्यासपीठावर नव्हतेच ! तुमच्यामध्ये पण बसलेले नव्हते. मी उभी होते एका कोपऱ्यात. आणि कोपऱ्यात उभ्या असलेल्या व्यक्तीकडे कोणाचं लक्ष जातं ? उत्सव माझा, माझ्या नावानं सगळं पण उपेक्षित मीच ! तू जे मघाशी विचारलंस ना की हा भरजरी शालू कशानं फाटला, त्याचं कारण आता तुझ्या लक्षात आलं असेल. नाही म्हणायला मला एका गोष्टीचा आनंद झाला.



## आनंदी पहाट

## नशिबातील योग नेहमीच कर्मावर आधारित

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थिनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच. असं म्हंटले जाते, कि प्रारब्धातील भोग आणि नशिबातील योग कधीही चुकवता येत नसतात. परंतू ह्या दोन्हींचा संबंध आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांशी निगडीत असतो.



आधुनिक केसरी

## वेदनेच्या पोटी | ज्ञानेश्वरी ||

माय बाप जाता | घर सुने झाले ||
आणिक पांगले | गणगोत ||१||
कैसे तू बा केले | माझ्या ज्ञानराया ||
आभाळाची छाया | झालासी तू ||२||
एकोप्यात वसे | सोसण्याचे बळ ||
निवृत्तीचे बाळ | धन्य जगी ||३||
ज्ञानाच्या सागरा | जनाने टाळले ||
विश्वाने पाळले | माउलीला ||४||
सटवाईची लिपी | होईल का खोटी ? ||
वेदनेच्या पोटी | ज्ञानेश्वरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

मूत्रकोड आणी परमें ।रक्तपिती रक्तपरमें ।
खडाचढाचेनि श्रमे ।या नांव आध्यात्मिक ॥२९॥
मुरडा हागवण उन्हाळे ।दिशा कोंडतां आंदोळे ।
येक वेथा असोन न कळे ।या नांव आध्यात्मिक ॥३०॥
गांठी ढळली जाले जंत ।पडे आंव आणी रक्त ।
अन्न तैसेचि पडत ।या नांव आध्यात्मिक ॥३१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मैं तो सुखी मैं दुखी हूँ,
जड़ चेतन मिल होय ।
स्थिर शुद्ध स्वरुप में, दुख सुख जगत
न कोय ।।५५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/५५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जड-चेतन संबंधामुळेच आत्म्याला सुख-दुःखाचे ज्ञान होते.जेव्हा आत्मा योगाद्वारे आपल्या चेतन शुद्ध स्वरूपाला प्राप्त करतो, त्यावेळी त्याला सुख-दुःख आणि जगाचे भान राहात नाही. तो आपल्या चैतन्यमय स्वरूपाने परमानंदात निमग्न राहातो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## जंगली महाराज


आधुनिक केसरी

त्यामुळे त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अतिशय व्यापक झाला. ते शेतात जाऊन कष्टाची कामे करीत व द्रव्यार्जन करीत. श्रमप्रतिष्ठेवर त्यांचा भर होता. आपल्या वयाच्या तरुणांना ते धार्मिक शिक्षण देत. वेदान्त, योगशास्त्र, मंत्रशास्त्र, राजयोग, हठयोग यांबरोबर हिमालय आणि आळंदी येथे नाथसंप्रदायी योग्यांबरोबर जंगली महाराजांनी साधनाही केल्या होत्या, असे म्हणतात. देशाटन करताना त्यांनी लोकांना त्यांच्या धर्माप्रमाणे उपदेश करणे, दीनदुबळ्यांच्या दुःखाचे निवारण करणे, तेथील सत्पुरुषांच्या समाध्या, तेथील देवस्थाने, मंदिरे यांचा जीर्णोद्धार करणे वगैरे कामे सुरू केली. जंगली महाराज नरसोबाच्या वाडीला असताना गतभर्तृका रखमाबाईं गाडगीळांनी त्यांचा अनुग्रह घेतला. त्यांना अष्टांगयोगात प्रवीण करून महाराजांनी रखमाबाईंना आपला उत्तराधिकारी नेमले. कऱ्हाडजवळच्या रेठरे हरणाक्ष येथील श्रीधरपंत कुलकर्णी ऊर्फ पठ्ठे बापूराव यांना जंगली महाराजांनी १८६५मध्ये अनुग्रह दिला. महाराजांच्या सहवासात आल्यावर पठ्ठे बापूराव यांचे काव्य शृंगाराकडून भक्तिमार्गाकडे वळले. जंगली महाराज यांनी इ.स. १८६८ साली पुण्याला येण्यापूर्वी क्षेत्र देहू येथे तुकाराम महाराजांच्या घरापासून ते त्यांच्या वैकुंठगमनाच्या स्थळापर्यंतचा रस्ता बांधवून घेतला आणि कडेला झाडेही लावली. तेथे भक्तांसाठी एक धर्मशाळा व पुंडलिकाचे मंदिर बांधले. आजही दर वर्षी तुकाराम बीजेच्या दिवशी जंगली महाराज भजनी मंडळ पुण्याहून भक्त पुंडलिकाची पालखी घेऊन देहूला त्या मंदिराकडे जाते. इनामदार वतनदार शिरोळे पाटील घराणे हे भांबुर्डे गाव (आजचे शिवाजीनगर) पुण्याचे पाटील हे जंगली महाराज यांचे पहिले व प्रमुख शिष्य मानले जातात, सदगुरू जंगली महाराज आणि ग्रामदैवत रोकडोबा महाराज यांचा मान शिरोळे पाटील घराण्याचा आहे.जंगली महाराजांना पुण्यात तुळसीबाई इंगळीकर नावाच्या बाई शिष्या म्हणून लाभल्या. शिरोळे पाटलांनी पुण्यात शिवाजीनगर गावठाण येथे रोकडोबा मंदिरासमोर श्रीरामाचे देऊळ बांधले. महाराजांचे पुण्यातल्या भांबुर्डे गावठाण्यातील रोकडोबा मारुती मंदिरात वास्तव्य असे. रोकडोबाचे त्या काळचे स्वरूप भैरवाचे असल्याने त्या मंदिरात पशू बळी देणे, विंचू-दंश झाल्यास देवासमोर वाद्यांचा गजर करून साकडे घालणे, नवसपूर्तीसाठी माणसाला बगाडाला अडकवणे वगैरे अघोरी प्रकार चालत. याबरोबर रेड्यांच्या झुंजी आणि तमाशेही चालत. जंगली महाराजांनी अनिष्ट गोष्टींना पायबंद घालताना केलेला पहिला बदल म्हणजे रोकडोबाचे भैरव हे स्वरूप बदलून त्याला मारुतीचे रूप दिले.

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

आधुनिक केसरी

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, ' मुलाचे प्रेम कसे येईल ?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना



सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात्, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे. ७. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १७ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# आपण सगळ्यांनी ह्या इतिहासाचे साक्षीदार व्हा : शरद पवार

## लोणंदच्या कृषि प्रदर्शनात गुंजला 'आवाज संघर्षाचे नाव तयाचे आहे शरद पवार'

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देशात अनेक संकटे आहेत.कांदा भाव पडले. परदेशात कांदा पाठविला.निर्यात बंदी केली. अन्नधान्याच्या निर्यातीवर बंधने घातली.
शेतकरी अडचणीत आला.ह्या सगळ्या गोष्टी या देशात घडत आहेत.हे घडत असताना ज्यांच्या हातात देशाच्या सत्तेची सूत्रे आहेत.ते या प्रश्नाकडे किंचीत ही ढुंकून बघायला तयार नाहीत.आम्ही पार्लमेंटमध्ये बसतो. पार्लमेंट ही देशाची महत्वाची लोकशाहीवादी संस्था आहे. तिचा सन्मान केला पाहिजे. तिथे प्रश्न मांडण्याची सर्वांना असली पाहिजे.हे लोकशाहीचे मंदीर आहे. आजअनेक प्रश्न आहेत.ते सोडविले पाहिजे.माझं एकच म्हणणे आहे.कुणी गेले, आणखीन काही तर आपण काही विचार करायचा नाही.लोक सांगतात कसं होईल काही काळजी करायची गरज नाही.कष्ट करायची तयारी आहे.त्यापेक्षा सुद्धा वैचारिक भूमिका ही मजबूत आहे.ही भूमिका जर मजबूत असेल तर कुणी काहीही करू शकत नाही. त्यांची जागा आपण लोकशाहीमध्ये दाखवून देऊ शकतो. याची तयारी आपण सगळ्यानी केली पाहिजे.नव्या पिढीचे लोक शोधून घेऊ,त्यांना शक्ती देऊ,त्याना संधी देऊ त्यांना अधिकार देऊ आणि महाराष्ट्राचा चेहरा माझी नवी पिढी ही बदलू शकते. हा इतिहास निर्माण करू. आपण सगळ्यांनी ह्या



इतिहासाचे साक्षीदार व्हा.असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.
लोणंद ता.खंडाळा येथे शरद कृषि महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून देशाचे माजी कृषिमंत्री,खासदार,पद्मविभूषण शरद पवार यांच्या शुभ हस्ते या प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले .यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त करत असताना आपल्या भावना व्यक्त केल्या.या कृषीप्रदर्शनाचे आयोजक असलेले डॉ.नितीन सावंत यांच्या विशेष प्रयत्नातून हे शरद कृषि महोत्सव भरत असून या आयोजना बद्दल सुद्धा शरद पवार यांच्या इतर मान्यवरांनी डॉ.नितीन सावंत आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले.या कार्यक्रम प्रसंगी सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीनिवास पाटील,आमदार बाळासाहेब पाटील,
आमदार शशिकांत शिंदे,आमदार रोहित पवार, प्रवीण गायकवाड,अभयसिंह जगताप,
सुनील माने,सारंग पाटील,दीपक पवार,सत्यजित पाटणकर,लक्ष्मण माने,सुनील गव्हाणे,दत्ताआबा चव्हाण,अनिलराजे निंबाळकर,चंद्रकांत ढमाळ, तृप्ती घाडगे,दिपाली शेळके,अजित यादव, शैलजा खरात,योगेश क्षीरसागर,सुरेश यादव,सुनील यादव दशरथ माने,एस वाय पवार उज्वला तांबे यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी शाहीर राजेंद्र कांबळे-कडूसकर यांनी पोवाड्यातून शरद पवार यांच्या वर आधारीत गाण्याचे सादरीकरण केले.
संघर्षाचे नाव तयाचे आहे शरद पवार हा आवाज कृषिप्रदर्शनातून गुंजला.पवार साहेबांच्या प्रति जयघोष करण्यात आला. पक्षनिष्ठा जपत शरद पवार यांच्या समवेत राहिलेल्या वाई
विधानसभा मतदारसंघातील काही मान्यवरांचा विशेष सन्मान हा एकत्रितपणे शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आला.यांमध्ये डॉ नितीन सावंत यांच्या सह दिलीप बाबर,विजयसिंह पिसाळ,
डॉ.सतिश बाबर,सुनील काका देशमुख,गणेश दानवले,संतोष नलवडे,संतोष पवार,महेंद्र गाढवे, बाळासाहेब शेळके,आशाताई भोसले आदींचा सन्मान करण्यात आला.डॉ.नितीन सावंत म्हणाले की,सातारा जिल्हा हा कायम साहेबांसोबत राहणार आहे.पक्ष आणि चिन्ह हिसकावून घेतलं असलं तरी साहेब तुम्हीच आमचे पक्ष आणि चिन्ह आहे.तुम्ही जे तोरण बांधाल तेच आमचे तोरण आहे.काहींनी शरद पवार साहेबांना संपविण्याचा चंग बांधला.
परंतु शरद पवार कधीही संपू शकत नाहीत.कारण शरद पवार हा एक विचार आहेत.चालतं बोलतं विचारपिठ म्हणजेच शरद पवार,इथे पुरोगामी विचारांचे मावळे तयार होत असतात.शरद पवारांचा विचार हा मराठी मातीत रुजलेला आहे.आज आपल्याला ह्या विचारासाठी लढावे लागणार आहे. आम्ही शरद पवार यांच्या विचारांचे ध्येय वेडे आहोत.सातारा जिल्हा हा तुम्हाला मानणारा आहे. आम्ही कायम तुमच्या सोबत राहू असे सुद्धा त्यांनी म्हटले.
आ.रोहित पवार म्हणाले की,शेतकऱ्यांना शेती संदर्भात नव नवीन गोष्टी समजल्या पाहिजेत यासाठी कृषि प्रदर्शन घेतली जात असतात.युवा शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान कळलं पहिजे.जे छोट्या मोठ्या कंपन्या असतील आपल्यातीलच युवा वर्गाने सुरू केलेल्या असतील याची माहिती लोकांपर्यंत जाण्यासाठी हे कृषिप्रदर्शन महत्त्वाचे असते.हे कृषिप्रदर्शन घेत असताना अनेक अडचणी आणल्या गेल्या हे समजले.परंतु शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने का अडचणी आणल्या जात असतात.इथे न येण्यासाठी अनेकांना फोन आले.परंतु शेतकरी ज्याचं ऐकत असतो.तो शेतकऱ्यांच्या हितासाठी लढत असतो. असे सुद्धा त्यांनी म्हटले.
आमदार शशिकांत शिंदे म्हणाले की, कृषिप्रदर्शनातून शेतकऱ्यांना भावी वाटचालीची दिशा दाखविली जात असते.आधुनिक यंत्रणा, उत्पन्न याचं मार्गदर्शन होत असते.शेतकऱ्यांना घडविण्याच काम या कृषि प्रदर्शनातून होईल असा
विश्वास व्यक्त करतो.साहेबांचा हा दौरा विश्वास निर्माण करणारा आहे.कुणी सोबत असो किंवा नसो परंतु आम्ही साहेबांसोबतच राहणार आहोत.
असे सुद्धा त्यांनी म्हटले.या कार्यक्रम प्रसंगीं लोणंद सह आसपासच्या भागातून व इतर जिल्ह्यातुन सुद्धा लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक गिरीश बनकर यांनी केले.

## आरक्षणासाठी सरणावर बसून अन्नत्याग उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**लोणीखुर्द :** जारंगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ





चंद्रशेखर साळुंके, संतोष निकम यांचे दि. १७ रोजी वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द येथील बस स्थानक या ठिकाणी सरणावर बसून अन्नत्याग उपोषण करणार आहेत. जरांगे पाटील यांच्या उपोषणाची शासनाने त्वरित दखल घेऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा व जरांगे पाटील यांना उपोषण लवकर सोडण्यास लावावे ही प्रशासनास व सरकार यांना विनंती करण्यात आली असून जरांगे यांची प्रकृती फार बिघडली आहे. आम्ही त्यांच्या काळजीपोटी व गरजवंत मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी लोणी खु. या ठिकाणी सरणावर बसून अन्नत्याग तसेच आमरण उपोषण सुरू करत आहोत. जरांगे पाटील यांचे प्रकृतीमध्ये काही बरे वाईट झाल्यास आम्ही त्या सरणावर बसून स्वाःतावर पेट्रोल टाकून अग्नीसमाधी घेणार आहोत याची प्रशासनाने नोंद घ्यावी. असे निवेदन उप अधिकारी, तहसील कार्यालय वैजापूर पोलीस निरीक्षक, शिवूर यांना देण्यात आले.

## कळंब तालुक्यात चक्का जाम; एकही बस धावली नाही

### बेमुदत चक्का जामसाठी चौकातच मांडला ठिय्या

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील प्रत्येक रस्त्यावर मराठा आरक्षणा साठी दिवसभर चक्का जाम साठी आंदोलन करण्यात आल्याने, सर्व वाहने ठप्प झाली तर प्रवाशी वाहतुकी साठी एक हि बस धावली नाही. कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तालुक्यातील मराठा आंदोलकांनी ठिय्या मांडला असून, तिथेच जेवणाची सोय करण्यात आली आहे. हे बेमुदत आंदोलन चालू राहणार असल्याचे मराठा आंदोलक अतुल गायकवाड, शुभम राखुंडे , राहुल पाटील, नितीन काळे, बाबुराव शेंडगे यांनी सांगितले. मराठा आरक्षण साठी उपोषणाला बसलेल्या मनोज जारांगे पाटील यांची प्रकृती खालावत चालली असून, त्यांना समर्थन देण्यासाठी कळंब सकल मराठा समाजाच्या वतीने , दिवसभर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, या मुळे वाहनांची रांग लागली होती. चौकातच ठिय्या आंदोलन



मांडल्याने, मोठ्या संख्येने मराठा आंदोलक येथे जमू लागले आहेत. बेमुदत बसण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.
उपोषण कर्ते मनोज जरागे पाटील यांची प्रकृती खालावत चालली आहे.या कडे शासनाचे लक्ष वेधण्या साठी या पूर्वी कळंब बंद ठेवण्यात आले होते. तर महाराष्ट्र बंद दिवशी सकल मराठा समाजाच्या वतीने,कळंब परळी रोड वरील पुलाजवळ टायर जाळून, व रास्ता रोको आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले. पण या वर हि शासन लक्ष देत नसल्याने, बेमुदत चक्का जाम आंदोलन तालुक्यात सुरू करण्यात आले आहे.आंदोलन चिघळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.
परवा रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते, या मुळे पाच जनावर पोलिस यांनी गुन्हे दाखल केल्याने, मराठा समाज संतप्त भावना व्यक्त करत आहे. त्या मुळे जरांगे पाटील यांचा आदेश येई पर्यंत उठणार नसल्याचे, सांगण्यात आले.

## मोप येथे स्वाभिमानीचा कर्जमुक्त सात बारा एल्गार मेळावा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील मोप येथे दि. 13 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7 वाजता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ युवक अध्यक्ष दामू अण्णा इंगोले, गजानन अहमदाबादकर यांनी कर्जमुक्त सात बारा या घोषणेचा शुभारंभ केला. तसेच शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी मिळाल्या शिवाय गप्प बसणार नसल्याचे प्रतिपादन यावेळी इंगोले यांनी केले. सोयाबीन, कपासी , पिकांना भाव नाही सत्ताधारी लोकांना माज आला असून, विरोधक ही मात्र मूग गिळून गप्प बसले आहेत. कोणताच विरोधी आमदार शासनाच्या धोरणाविरोधात ब्र शब्द काढत नाही. अर्थातच आंधळ दळते आणि कुत्र पीठ खाते अशी गट सद्यस्थितीत झाली आहे. यावेळी इंगोले यांनी अनेक मुद्दे हाताळले यामधे त्यांनी प्रामुख्याने मागील वर्षापासून शेतकऱ्यांना खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीन चा पीकविमा मिळवून दिला आहे. तसेच यावर्षी सुद्द्धा त्यांनी सतत होणाऱ्या अवकाळी,अवर्षण,निसर्गाचा लहरीपणा आणि लोकप्रतिनिधीची अकार्यक्षमता यामुळे सतत शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे. त्यामुळे आम्ही या वर्षी पहिल्या पासूनच पिकविम्या बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मंत्रालय आणि शेवटी उच्च न्यायालयात धाव घेतली तेंव्हा कुठे अर्ध्या शेतकऱ्यांना सोयाबीनच्या पीकविमा मिळाला असून उर्वरित शेतकऱ्यांना 20 फेब्रुवारी पर्यंत पीकविमा मिळण्या बाबतचे लेखी आश्वासन पीकविमा कंपनी कडून घेतले असल्याचे सांगितले.तसेच केंद्र शासनाने डीओसी चे भाव पाडून मोझांबिक देशांसोबत दहा वर्षांचा करार केल्याने शेतकऱ्यांची सोयाबीन ही



2013 च्याच भावात आज विकल्या जात आहे. पण याचे कोणालाच देणे घेणे नाही. विधानभवनात एकही आमदार या ज्वलंत प्रश्नावर बोलत नाही. केंद्र शासनाने पन्नास उद्योगपतींचे 68607 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले असून जनतेचा पैसा उद्योगपतींच्या घशात घातला असून त्याला कुठलाही अर्ज करण्याची गरज पडली नाही.मात्र संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर पीक कर्ज, शेतिऊपयोगी साहित्यांचे असे सर्व प्रकारचे कर्ज धरून फक्त 53 हजार कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यावर आहे. हे कर्ज उद्योगपतींना दिलेल्या कर्ज माफि पेक्षाही कमी असून यामधे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी हे कर्जमुक्त होऊ शकतात.त्या साठी सर्व शेतकऱ्यांनी कर्ज मुक्त सात बारा अर्ज भरून देण्याचे आवाहन करण्यात आले असून कर्जमुक्ती चा पहिला मेळावा रिसोड तालुक्यातील मोप येथून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा यलगार मेळाव्याची सुरुवात यावेळी तालुक्यातील मोप येथून करण्यात आली. यावेळी रिसोड तालुक्यातील हजारो शेतकरी सदर मेळाव्यास उपस्थित होते.

# अजित दादांचे भावनिक आवाहन

आधुनिक केसरी

बारामती लोकसभा मतदारसंघात अजित पवार आपल्या गटाचा उमेदवार उभा करणार आहेत, हे आता जवळपास निश्चित झाले आहे. अजित पवार यांनी दोन आठवड्यापूर्वी तसे सुतोवाच केले होते. त्यानंतर आज पुन्हा त्यांनी बारामतीमध्ये भावनिक आवाहन केले. यावेळी त्यांनी शरद पवार गटाच्या संभाव्य आरोपांवर पलटवार केला. तसेच अजित पवार यांनी बंड का केले? बंडाच्या आधी आणि नंतर काय काय झाले? याची सर्व माहिती बारामतीकरांना दिली. आगामी निवडणुकीत माझ्याविरोधात प्रचार केला जाईल, त्याला बारामतीच्या जनतेने उत्तर द्यावे, असेही ते म्हणाले. बारामती येथील सभेत अजित पवार म्हणाले की, आमचे वरिष्ठ (शरद पवार) मध्यंतरी बोलले मी राजीनामा देतो. आम्ही कुणीही राजीनामा मागितला नव्हता. वरिष्ठांच्या इच्छेनंतर आम्ही सर्व नेते बसून आताच्या खासदार (सुप्रिया सुळे) यांना राष्ट्रीय अध्यक्ष करण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्या इतर नेत्यांना मी विश्वासात घेऊन हे मान्य केले. पण दोन-तीन दिवसांत काय चक्र फिरली माहीत नाही, ते म्हणाले मीच अध्यक्ष राहतो. आम्ही सातत्याने वरिष्ठांना सांगत होतो की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे बहुमत राहिले नाही तर आपण देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा देऊ. पण त्यालाही विलंब झाला आणि त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. मी मुख्यमंत्रीपदाकरिता हपापलेल माणूस नाही, असेही अजित पवार म्हणाले. २००४ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिक जागा येऊनही वरिष्ठांनी उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानले. त्यांचे आदेश शिरसावंद्य मानले. तेव्हाही मी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नव्हतो. तेव्हा आर. आर. पाटील किंवा छगन भुजबळ मुख्यमंत्री होऊ शकले असते. कारण ते त्यावेळी राष्ट्रवादीचे मोठे नेते होते. मी २०१० साली उपमुख्यमंत्री झालो, अशी माहिती अजित पवार यांनी दिली. लोकशाहीमध्ये बहुसंख्याकांच्या मताला महत्त्व असतं. आमच्या पक्षातील अनेक आमदारांनी सांगितले की, भूमिका घ्या. पण वरिष्ठ काही ऐकायला तयार नव्हते. उद्धव ठाकरे सरकार जेव्हा जाणार हे स्पष्ट झाले, तेव्हा माझ्या दालनात सर्व आमदारांनी सह्या करून आपण भाजपाबरोबर सरकारमध्ये जाऊ, हे मान्य केले. तेही (भाजपा) आम्हाला घ्यायला तयार होते. पण वरिष्ठांनी ऐकले नाही. त्यानंतर काही दिवसांनी आम्ही पुन्हा वरिष्ठांना भेटून याबाबत विचारणा केली. पण वरिष्ठांनी उत्तर दिले नाही. शेवटी २ जुलै रोजी आम्ही सरकारमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. हे करत असताना आम्ही निवडणूक आयोगासमोर गेलो आणि आमची भूमिका मांडली. महाराष्ट्रातील बहुतेक जिल्हाध्यक्ष आमच्याबाजूने आले. कारण त्यांनाही कळत होते की, आम्ही घेतलेला निर्णय पक्षासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी घेतला, असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

# मराठा समाजासाठी शासनाच्या विविध योजना

आधुनिक केसरी

**राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात असलेल्या मागणीच्या अनुषंगाने इतर समाजाप्रमाणेच मराठा समाजासाठी देखील विविध योजना राबविण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. त्या अनुषगाने गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध योजनांमुळे मराठा समाजास मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांसाठी भरीव निधी उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये शिक्षणाच्या योजनांना सर्वाधिक प्राधान्य दिले असल्याने मराठा समाजातील नवी पिढी घडण्यास निश्चितच मदत होणार आहे. शासनाकडून या योजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी होत असल्याने मराठा समाजाकडून शासनाबद्दल धन्यवाद देण्यात येत आहेत.**

या योजनांमध्ये प्रामुख्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत वैयक्तिक आणि गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत ७४ हजार ८७३ लाभार्थ्यांना ५ हजार ६५९ कोटी बँक कर्ज मंजूर त्यावरील ६०८.१२ कोटी रूपयांचा व्याज परतावा वितरित करण्यात आला आहे. महामंडळाकडून ३५ गट प्रकल्पांना ३.३५ कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे.

सारथी संस्थेचे पुणे येथील मुख्यालय इमारत आणि ६ विभागीय कार्यालये आणि लातूर व कोल्हापूर येथील उपकेंद्र तसेच ५०० मुले आणि ५०० मुलींच्या वसतिगृहासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिली. बांधकामासाठी रु.१ हजार १८८.८२ कोटी रूपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेंतर्गत ३ लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना १ हजार २९३ कोटी निर्वाह भत्ता वितरित करण्यात आले आहेत.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७ लाख ५४ हजार ४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी रु.१ हजार २६२ कोटी मंजूर करण्यात आले आहे . छत्रपती राजाराम महाराज सारथी गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी मागील वर्षी ३२ हजार ६३९ विद्यार्थ्यांना रु. ३१ कोटी वितरित करण्यात आले आहेत. तसेच यावर्षी ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना रु.४२ कोटी रुपये मंजूर केले आहेत. मराठा समाजाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी रु.२१ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात प्रथमच ह्या योजनाचा लाभ मराठा समाजाच्या विद्यार्थाना मिळणार आहे.

मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या स्वाधार योजनेच्या धर्तीवर निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे . प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष ६० हजार महानगराच्या ठिकाणी, रु.५१ हजार विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी, रु.४३ हजार जिल्ह्याच्या ठिकाणी आणि रु.३८ हजार तालुक्याच्या ठिकाणी निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे वितरीत करण्यात येणार आहे.

मराठा आरक्षण कायदा सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्यामुळे शासकीय सेवेत निवड होऊन नियुक्ती न मिळालेल्या १ हजार ५५३ उमेदवारांची अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

विविध न्यायालयीन प्रकरणात कोविड-१९ मुळे नोकरभरती प्रक्रिया रखडलेल्या उमेदवारांसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन एम. पी. एस. सी. व अन्य शासकीय सेवेत




३ हजार २०० उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. एस. ई. बी. सी. मधून इ. डब्ल्यू. एस. व खुल्या प्रवर्गाचा विकल्प देऊन उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा ऐतिहासिक निर्णय, अशा प्रकारे एकूण ४ हजार ७०० उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली.

सारथी कडून मागील तीन वर्षात प्रशिक्षण घेतलेल्या ५८ विद्यार्थ्यांची यू. पी. एस. सी. (१२ आय. ए. एस., १८ आय. पी. एस., ८ आय. आर. एस., १ आय. एफ. एस., २ भारतीय वन सेवा, ५ सी. ए. पी. एफ. व इतर सेवा १२) तर ३०४ विद्यार्थ्यांची एम. पी. एस. सी. मार्फत निवड झाली आहे. सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत (पी. एच. डी. करीता) मराठा समाजाच्या २ हजार १०९ विद्यार्थ्यांना रु.११६.३४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहे.इ. डब्ल्यू. एस. अंतर्गत १० टक्के आरक्षणातून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये ३१ हजार विद्यार्थ्यांपैकी ७८ टक्के मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश. तसेच एम. पी. एस. सी. मार्फत शासकीय सेवेत ६५० उमेदवारांपैकी ८५ टक्के मराठा समाजाच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सारथीमार्फत ३६ हजार ७२६ विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विविध योजना राबवताना त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याबाबत सातत्याने आढावा घेत असतात त्यामुळे विविध योजनांच्या अंमलबजावणीत गती निर्माण झाली आहे.

कायद्याच्या चौकटीत टिकणारे व इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजास आरक्षण देण्याच्या दृष्टिने चर्चा करण्यासाठी दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे.


मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठीचा सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सुपूर्द राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला आहे.

विक्रमी वेळेत, अहोरात्र काम करून सर्वेक्षण पूर्ण केल्याबद्दल कौतुक मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून राज्यात युद्धपातळीवर मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. याकामी गोखले इन्स्टिटयूट, आयआयपीएस या नामांकित संस्थेची मदत झाली. विशेष अशा सॉफ्टवेअर प्रणालीच्या माध्यमातून हे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य शासनाने मागासवर्ग आयोगाला सांगितले होते. साडेतीन ते चार लाख लोक यासाठी दिवसरात्र काम करीत होते. सादर करण्यात आलेला अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन त्यावर चर्चा होईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.

**राजू धोत्रे,** विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय मुंबई-३२

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला.**

त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# सकल मराठा समाजाचे बैलगाडीसह जेल भरो आंदोलन

## मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडल्याने मराठा समाज आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर

**जिंतूर :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मागील सहा दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली असल्यामुळे सकल मराठा समाज राज्य सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत आहे म्हणून दिनांक 16 फेब्रुवारी रोजी 12 वाजता जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाजाने बैलगाडीसह जेलभरो आंदोलन केले यावेळी मोठ्या प्रमाणत मराठा समाज सामील झाला होता. मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाचा मागणीसाठी मागील सहा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहे यावेळी त्यांची दिवसेंदिवस प्रकृती खालावत चाललेली आहे. मात्र राज्य सरकारकडून वेळ काढू पणा होत असून उपोषणाची दखल घेतली जात नाही म्हणून राज्यात सर्वत्र आंदोलनास सुरवात झाली आहे त्या अनुषंगाने तालुक्यातील सकल मराठा समाजाने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमवून बैलगाडीसह जेलभरो आंदोलन करण्यात आले. यावेळी मराठा समाजातील तरुणांनी आपल्या मनोगतातून राज्यसरकार विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान पोलिसांनी सर्व आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन सोडून देण्यात आले शिवाय आगामी काळात मराठा आरक्षणाचा तिढा सुटला नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.
यावेळी पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# सिद्धार्थ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**जाफराबाद :** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४च्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक १७ फेब्रुवारी२०२४ रोजी करण्यात आले आहे. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगरचे प्र.कुलगुरू मा.प्रोफेसर डॉक्टर वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय दादासाहेब म्हस्के,संस्थापक अध्यक्ष सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.व्यंकटेश लांब व्यवस्थापन परिषद सदस्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तर पारितोषिक वितरण समारंभ सायंकाळी ४ वाजता होणार असून. समारोप समारंभ प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.प्राचार्य राहुलजी मस्के सचिव,सिल्लोड शिक्षण संस्था तथा माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर हे असून प्रमुख पाहुणे म्हणून माननीय डॉ.संजय मोहड संगीत विभाग प्रमुख डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर हे उपस्थित राहणार आहेत.
कार्यक्रमात आनंद नगरी,शेला-पागोटे,संगीत खुर्ची तसेच पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन होणार असून विद्यार्थ्यांनी व पालकांनी तथा निमंत्रित सर्व पालक तथा मान्यवर व पत्रकार बंधू यांनी स्नेह संमेलनास आवर्जून उपस्थित रहावे. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख उपप्राचार्य प्रोफेसर डॉ.सुनील मेढे, उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. रमेश उबाळे स्नेहसंमेलन सहप्रमुख प्रा.डॉ.एम.जी. मोरे यांनी केले आहे.



# अध्यक्षपदी गंगवाल, उपाध्यक्षपदी कोटस्थाने

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरातील अग्रणगन्य असलेल्या श्री साई अरिहंत नगरी सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक बैठक नुकतीच बिनविरोध पार पडली त्यावेळी सहाय्यक निबंध रावसाहेब खेडकर उपस्थित होते या बैठकीत चेअरमन सतीश गंगवाल तर व्हाईस चेअरमनपदी मंहेद्र कोटस्थाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी बोलताना सहाय्यक निबंध रावसाहेब खेडकर म्हणाले की पतसंस्थेचे सामाजिक कार्य कौतुकास्पद असून वाटचाल ठेवी बघता हि बाब समाधान देणारी असली तरी भविष्यातील स्पर्धाना सामोरे जाताना थकबाकीचे प्रमाण वाढणार नाही यासाठी सर्व संचालक मंडळाने एक विचाराने काम करावे व कर्ज वितरण करताना नातेसंबंधात कर्ज वितरण सहसा टाळावे त्याबरोबरच पाच लाखाच्या पुढे कर्ज देताना या पुढील काळात दोन नव्हे तर तीन जामीनदार घेऊन कर्ज वितरण योग्य ते कागदपत्र घेतल्यानंतर केले तर एन पी ए कमी होण्यासाठी मोठी मदत होणार असून त्याबरोबरच योग्य ते खात्रीशीर कागदपत्राची पूर्तता झाल्यानंतर कर्ज वितरण केले पाहिजे कारण पतसंस्था चळवळ मोठ्या स्पर्धांना सामोरे जात असून अशावेळी संचालक मंडळाने खर्चात काटकसरी बरोबरच सामुहिक एक विचाराने प्रयत्न केला तर चागले परीणाम दिसणार असल्याचे सांगितले यावेळी चेअरमन सतीश गंगवाल म्हणाले की या पुढील काळात कर्ज वितरण करताना आधिक दक्षता घेतली जाणार असून कोविड काळात देखील बाजारपेठेत मोठ्या अडचणी निर्माण झाल्या असताना त्याला समोर जात पतसंस्थेची वाटचाल चालू आहे मागील काही काळापासून बाजारपेठ पूर्व पदावर येत असून थकबाकीदार कर्जदारांनी आता लगतच्या काळात कर्ज बेबाक करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त केले त्या दृष्टीने संचालक मंडळ प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले यावेळी संजय संकलेचा किशोर गंगवाल दत्तात्रय गोंदकर मंगेश गंगवाल पुंजा घोडे नवनिर्वाचित संचालक संजय दुशिंग सौ रत्नमाला राका सुमन व्यवहारे कुमारी प्रतीक्षा जगताप आदी उपस्थित होते यावेळी नवनिर्वाचित चेअरमन व्हाईस चेअरमन व संचालक यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी व्यवस्थापक गोरक्ष दिघे यांनी आभार मानले

# 'मेडीगड्डा' धरणामुळे जीव टांगणीला!

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** तेलंगणाचे नवे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी १३ फेब्रुवारी रोजी आपल्या मंत्रिमंडळ व आमदारांसह गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर उभारण्यात आलेल्या 'मेडीगड्डा' धरणाचा दौरा केला. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले. पण तडे गेल्यामुळे हे धरण धोकादायक झाले असल्याने भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष न करता त्यांची अंमलबजावणी करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील सिरोंचा तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीवर तेलंगणा सरकारने उभारलेल्या मेडीगड्डा धरणाला तडे गेल्याने ऐन विधानसभा निवडणुकीत यावरून वाद निर्माण झाला होता. काँग्रेससह विरोधी पक्षाने मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव आणि त्यांच्या कुटुंबियांवर कालेश्वरम उपसासिंचन प्रकल्पात एक लाख कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला होता. निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाने तेलंगणात सत्ता स्थापन केली. त्यानंतरही 'मेडीगड्डा'चा वाद सुरूच असून मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी आपल्या मंत्रिमंडळासह सीमाभागात धडक देत धरणाची पाहणी केली. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखरराव यांच्यावर पुन्हा टीकास्त्र सोडले. मात्र, तडे गेल्याने 'एनडीएसए'कडून धोकादायक ठरविण्यात आलेल्या या धरणामुळे महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमाभागावर भविष्यात मोठे संकट ओढवून शकते. याकडे राजकीय पक्षांकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये रोष आहे. महाराष्ट्र सरकारकडून देखील यावर कुठलीच ठोस प्रतिक्रिया आलेली नाही. केंद्राच्या राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण पथकाने २४ ते २७ ऑक्टोबरदरम्यान या धरणाची पाहणी करून अहवाल सादर केला होता.

# 'त्या' आंदोलनास शेतकरी संघटनेचा जाहीर पाठिंबा : ॲड. काळे

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** किमान आधारभूत किंमतीसाठी शांततेच्या मार्गानं आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या विरोधात पोलिस आणि सुरक्षादलांचा वापर पाहता,मोदी सरकारनं जनतेच्या मनातील विश्वास गमावला असून लोकशाही समाजात प्रत्येक नागरिकाकडे शांततेच्या मार्गानं आंदोलन करण्याचा अधिकार असताना केंद्र सरकार मात्र ते आंदोलन दडपू पाहत असून तो डाव कधीही यशस्वी होणार नाही त्यास राज्याच्या शेतकरी संघटनेने पाठबळ असल्याचे प्रसिद्धी पत्रक शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड अजित काळे यांनी प्रसिद्धीस दिले आहे. आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटना पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्या असून,हे शेतकरी आता दिल्लीकडे कूच करीत आहेत.त्यामुळे हे आंदोलन आता पंजाब,हरियाणासह उत्तरेतील अनेक राज्यांसह महाराष्ट्रातही पसरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान,मंगळवार दि.१३ फेब्रुवारी रोजी हे शेतकरी शंभू सीमेवर दाखल झाले असताना पोलिसांनी शेतकऱ्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला.या आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या. त्यामुळे हे आंदोलन आता आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.सरकार त्यांना चर्च साठी निमंत्रण देत असले तरी त्यात गंभीरता दिसत नाही त्यामुळे त्यात वेगळे काही साध्य होण्याची शक्यता नाही केवळ आगामी निवडणूका काढण्यासाठी चलढकल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे या पार्श्वभूमीवर हे प्रसिद्धी पत्रक माध्यमांकडे सोपवले आहे. त्या प्रसिद्धी पत्रकात ॲड काळे यांनी पुढे म्हटले आहे की,"उत्तर भारतातील विविध शेतकरी संघटनांनी,"किमान आधारभूत किंमत (एमएसपी) म्हणजे हमीभावासाठी कायदा करावा,डॉ.एम.एस. स्वामीनाथन आयोगाने केलेल्या शिफारशी लागू कराव्यात.शेतकऱ्यांचे कृषी कर्ज माफ करावे,कृषी वस्तू,दुग्धजन्य पदार्थ,फळे,भाजीपाला व मांसाची आयात कमी करावी,आयात शुल्कात वाढ करावी,५८ वर्षांवरील शेतकरी आणि शेतमजुरांना निवृत्तिवेतन योजना लागू करावी,दरमहा १० हजार रुपये निवृत्तिवेतन द्यावे यांसह विविध रास्त मागण्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांनी चार पैसे कमवायचे म्हटले की,सरकारच्या पोटात दुखू लागते हा नेहमीचा रोग सरकारला जडला आहे.त्यावेळी सरकार विक्रीवर निर्बंध आणणार आणि जेव्हा शेतमालाचे भाव पडतात तेव्हा शेतकऱ्यांना सरकार वाऱ्यावर सोडणार,असा हा प्रकार सातत्याने सुरु आहे.कांद्यास जेव्हा जागतिक पातळीवर मागणी होती त्या वेळी केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी जारी केली आणि जेव्हा कांद्याचे भाव गडगडले,जेव्हा शेतकऱ्यांची किमान गुंतवणूकही वसूल होणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली होती.तेव्हा सरकार कांदा हे नाशवंत पीक आहे असे बोंब मारून सांगुन त्याची खरेदी बंद केली होती.स्वतःला सोयीचे असेल तेव्हा बाजारपेठेकडे बोट दाखवायचे आणि गैरसोयीचे असेल तेव्हा आर्थिक तत्त्वज्ञान सांगायचे असे आपल्या सरकारचे दुहेरी चारित्र्य राहिलेले आहे. त्यामुळे याबाबत एक घाव दोन तुकडे करण्याची वेळ आता आली आहे.याचे कारण फुकटखाऊ मध्यमवर्गाची,शहरातील मतदारांची सरकारला जास्त काळजी वाटत असून त्यासाठी सरकार हे सोपस्कार करत आहे.जागतिक पातळीवर मागणी वाढली तर सरकार निर्यातीस परवानगी देत नाही व हमी भावही देत नाही त्यामुळे शेतकऱ्यास नीट जगता येत नाही व मरता येत नाही त्यामुळे तो शेतकरी नाईलाजाने आत्महत्या करत आहे.याचे सरकारला काही देणे घेणे नाही असे वारंवार दिसून आले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना किमान हमी भाव मिळणे गरजेचे झाले आहे.त्यासाठी राज्याची शेतकरी संघटना व निळवंडे कालवा कृती समिती या आंदोलनास पाठींबा देत आहे.मात्र याबाबत राज्यातील शेतकऱ्यांच्या नावाने मते मागणारे नेते 'च'कार शब्द काढण्याची तसदी घेणार नाही अशी कोपरखिळी शेवटी प्रदेश उपाध्यक्ष ॲड अजित काळे यांनी राज्यातील साखर सम्राट व व दारू, शिक्षण सम्राट आदींना लगावली आहे.
सदर प्रसिद्धी पत्रकावर शेतकरी संघटनेचे अ.नगर जिल्हाध्यक्ष अनिल औताडे,श्रीरामपूर तालुकाध्यक्ष युवराज जगताप,निळवंडे कालवा कृती समितीचे संस्थापक नानासाहेब जवरे,अध्यक्ष रुपेंद्र काले,कार्याध्यक्ष मच्छीन्द्र रहाणे,गंगाधर रहाणे,उपाध्यक्ष संजय गुंजाळ,संघटक नानासाहेब गाढवे,अशोक गांडोळे,सोन्याबापू उऱ्हे सर,सचिव कैलास गव्हाणे,बाबासाहेब गव्हाणे,कौसर सय्यद,रावसाहेब मासाळ,भिवराज शिंदे,सोमनाथ दरंदले आदींच्या सह्या आहेत.

# स्त्री-पुरुषांनी व्यक्त होणे काळाची गरज

## डॉ. तुषार शितोळे : समुपदेशन – लिंगभाव संकल्पना : कृतिसत्राचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** पुरुषांनी घरापासून समाजात वावरताना आपल्याशी संबधित प्रत्येक स्त्रीशी जसे की आई, पत्नी, मुलगी, मैत्रीण यांच्याशी सुसंवाद साधला पाहिजे असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांनी मांडले. डॉ.शितोळे पुढे म्हणाले की, तरुणांनी मोबाईलमध्ये न अडकता कुटुंबातील सदस्यांबरोबर वेळ घालवण्यासाठी प्रयत्न करावा असे आपले मत व्यक्त केले. महिला व पुरुषांमध्ये पूरकता निर्माण होऊन समानता येणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानता नसणाऱ्या जुन्या रूढी परंपरा सोडून नवीन परंपरा निर्माण करणे काळाची गरज आहे असे मत डॉ.स्नेहल आपटे यांनी व्यक्त केले. राजकारण, समाजकारण व अर्थकारण या सर्वच क्षेत्रात समानता यायला हवी हे आपल्या विविध कृतीतून आणि उदाहरानांतून साधना सेठिया यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे समन्वयक प्रा.संदीप लांडगे यांनी मांडले. सूत्रसंचालन प्रा.प्रल्हाद ननावरे यांनी केले तर आभार प्रा.जीवन गायकवाड यांनी मानले.

या कार्यक्रमाचे संयोजन प्रा.संदीप लांडगे, डॉ.हिमालय सकट, प्रा.पौर्णिमा कारळे, डॉ.जगदीश शेवते, प्रा.प्रल्हाद ननावरे, प्रा. कोमल पोमण, प्रा.माऊली कोंडे, प्रा. दयानंद जाधवर, प्रा.महेश कोळपे, प्रा.जीवन गायकवाड, प्रा.ऋतुजा साळुंके, श्री.महेश दळवी, श्री.धनाजी माने, श्री.अभिजित मोरे, मनीषा मोहिते यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

# समता इंटरनॅशनल स्कूल येथे रस्ता सुरक्षा सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील समता इंटरनॅशनल स्कूल मध्ये रस्ता सुरक्षा अभियान २०२४ अंतर्गत श्रीरामपूर येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने 'रस्ता सुरक्षा सप्ताह' श्रीरामपूर येथील मोटार वाहन निरीक्षक प्रशांत कंकरेज व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक धनंजय गावित यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. मार्गदर्शन करताना मोटार वाहन निरीक्षक प्रशांत कंकरेज म्हणाले की, शाळेचे कोणतेही वाहन चालवत असताना वाहका जवळ स्वतःचे ओळखपत्र, लायसन्स, गाडी चालवत असलेल्या गाडीची कागदपत्रे असणे महत्त्वाचे आहे. तसेच ज्या भागात गाडी चालवायची असेल, त्या भागाची माहिती, वाहतुकीच्या नियमांबरोबरच गाडी चालवणारा वाहक हा व्यसनमुक्त असला, तरच तो परिपूर्ण वाहक बनेल.

या रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त समता इंटरनॅशनल स्कूलच्या वाहतूक विभागातील ५२ वाहन चालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच वाहन चालकांसोबतच चालकांना मदत करणारे मदतनीस व वाहनांचीही तपासणी करण्यात आली. या शिबिराला सुवर्णा ड्रायव्हिंग स्कूलचे अध्यक्ष संतोष आहेर यांचे ही सहकार्य लाभले.

# सेवा जन्मोत्सवनिमित्त सोनापूर येथे प्रथमच भव्य प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज




**जिंतूर :** जगतगुरु सेवालाल महाराज यांची 285 वी जयंती संपूर्ण देशात साजरी करण्यात येत आहे. त्यामध्ये सोनापुर येथे लक्ष वेधून घेणारी जयंती साजरी करण्यात आली.

सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त सर्व सोनापुर येथील नव तरुण व गोर सेना यांच्या संकल्पनेतून दि 13 फेब्रुवारी पासूनच प्रबोधनात्मक जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान या मध्ये सांस्कृतिक व पारंपरिक नृत्य, भाषण आणि नाटक समाविष्ट होत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन चारठाना पोलीस स्टेशन चे पोलिस निरीक्षक कापूरे, जमादार केजगीर, माजी पं.स.सभापती उत्तम जाधव, सं.तु.म.विद्यालय प्राचार्य एस. चव्हाण, गवई, कवडे, सुधाकर दराडे, माजी सरपंच कवडे यांची विशेष उपस्थिती होती. दरम्यान सदर जयंतीला मोठ्या संख्येने गावातील नागरिक उपस्थित होते. गावाचे प्रतिष्ठीत नागरिक नायक, कारभारी, मानकरी, सरपंच, उपसरपंच, तंटा मुक्ति अध्यक्ष, पो.पाटील, ग्रा. सदस्य, ग्रा.पं.कर्मचारी, आणि सर्व भजनी मंडळ उपस्थित होते. बंजारा समाज आता दिवसेन दिवस जागृत होत आहे आणि म्हणूनच गावो गावी मोठ्या प्रमाणात सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या थाटात साजरा करण्यात येत आहेत. सोनापुर मध्ये सुद्धा दिसेन दिवस कार्यक्रम आणि उल्हास वाढत राहील असे सरपंच दिपक चव्हाण यांनी सांगितले.

# आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींना होता येणार वैमानिक : प्रशिक्षण देण्याचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** नक्षलग्रस्त, दुर्गम व आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींचे वैमानिक होण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी चंद्रपूर फ्लाईंग स्टेशन अंतर्गत मोरवा विमानतळ, चंद्रपूर येथे जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाकरीता प्रति विद्यार्थी एकूण प्रशिक्षण खर्च रुपये अंदाजे 41 लक्ष येणार असून, लेखी परीक्षा व वैद्यकीय तपासणीअंती निवड करण्यात येणाऱ्या एकूण 10 विद्यार्थ्यांकडून एकूण प्रशिक्षण खर्चाची 10 टक्के रक्कम भरून घेऊन त्यांना 18 महिन्याचे वैमानिक प्रशिक्षण देण्याचे प्रयोजन आहे. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता 10+2 भौतिकशास्त्र व गणित विषय घेऊन, ग्रामीण भागासाठी किमान 65 टक्के गुण व शहरी भागासाठी किमान 70 टक्के गुण प्राप्त करून पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा किंवा झालेली असावी. उमेदवार डीजीसीए मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या तपासणीमध्ये शारीरिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक आहे. सदर प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता जिल्हा प्रशासनाकडून अर्ज मागविण्यात येतील. त्यानंतर लेखी परीक्षेद्वारे पात्र झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल व अंतिमरित्या पात्र विद्यार्थ्यांची वैमानिक प्रशिक्षणाकरिता निवड करण्यात येईल, असे उपजिल्हाधिकारी (अति.) दगडू कुंभार यांनी कळविले आहे.

# पैठणमध्ये क्रीडाप्रेमींचा 19 फेब्रुवारीला सामूहिक आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** कै. दिगंबरराव कावसानकर क्रीडांगण, महाराष्ट्र शासन क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या जागेवर अतिक्रमण करुन अनधिकृत रस्त्यांचे बेकायदा बांधकाम तात्काळ रद्द करणे, महाराष्ट्र शासन गट क्रमांक 240 मोजणी यांनी सर्व जमीन ताब्यात घेऊन त्यावर संरक्षक भिंत बांधावी, मोजणीच्या सर्व जमिनीचे शासकीय शुल्क भरूनही भूमी अभिलेख कार्यालयाचे प्रवीण मोरे नवाचा मोजणीदार हे मोजणीचा नकाशा बनवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत ज्याचा फायदा होईल. सर्व जमिनींऐवजी अतिक्रमण धारक. या भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करून त्याच्या सर्व मालमत्तेची त्वरित चौकशी करण्यात यावी. अन्यथा 19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा संकुल येथे सामूहिक आत्मदहनाचा क्रिडाप्रेमी, खेळाडु विजय सुते सह निवेदनावर सह्या करणारानी लेखी निवेदन तहसीलदार यांना दिले आहे.

**या मागणी साठी आत्मदहन :** 1) भूमिअभिलेख कार्यालय द्वारे तात्काळ संपूर्ण गट क्रमांक २४० ची पूर्ण मोजणी करून हद्दी खुणा कायम करून घेऊन, कोर्टामध्ये कॅवेट दाखल करून संरक्षक भिंत बांधणे. 2) अतिक्रमणधारकाला भूमिअभिलेख कार्यालयातील सहकार्य करणारे मुख्यालयी निवास न करणारा कर्मचारी प्रवीण मोरे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी व त्यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी करण्यात यावी. 3) फेर क्रमांक ५५५१ हा तात्काळ रद्द करण्यात यावा. 4) बोगस फेर आदेश करणारे, बोगस कागदपत्रे करणारे कर्मचारी व त्यांना सहकार्य करणारे यांचावर तत्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे. 5) गट क्रमांक २३९ जो कि शासनाच्या जागेच्या मधोमद आहे, क्रीडासंकुलास अधिकची जागा करिता तात्काळ जागेचे अधिग्रहण करून त्या ठिकाणी उच्च दर्जाचे संकुल व क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. आमच्या वरील सर्व मागणीवर दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ च्या आत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अन्यथा दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी विजय सुते सह निवेदनावर सर्व खाली सही करणारे छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा परिसर, पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे सामुहिक आत्मदहन करणार आहोत. होणाऱ्या सर्व परिणामास आपले कार्यालय व महाराष्ट्र शासन, प्रशासन पूर्णतः जबाबदार राहील याची आपण नोंद घ्यावी.

# संत गुलाब बाबा पारायण सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** संत गुलाब बाबा यांच्या आशीर्वादने, श्री गुलाबदास महाराज यांच्या प्रेरनेने व हभप. कारभारी महाराज पंडित यांच्या मार्गदर्शनखाली व हभप. विशवास मामा गडाख यांच्या प्रमुख उपस्थित सीधेश्वर श्री संत गुलाबबाबा ग्रंथ यांच्या फिरता पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह व पादुका दर्शन सोहळा दी.17 फेब्रुवारी ते 24 फेब्रुवारी पर्यन्त राहुरी रोडवरील देवकीनंदन कॉलनी येथे आयोजित केल्याची माहिती आयोजक यांनी दिली.

दैनिदिन कार्यक्रमात रोज सकाळी 8.32 ते 11.32 पर्यन्त पारायण वाचन,रोज रात्री 7 ते 9 प्रसिद्ध किर्तनकर यांचे किर्तन मालिका सुरु राहणार असून या कालावधित ध्वजारोहन, ग्रथपूजन, पादुका अभिषेक, बाबाचे अनुभव कथन,हरिपाठ, असे दिवसभर धार्मिक कार्यक्रम होणार आहे, तरी या पारायण सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवहन संत गुलाब बाबा भक्त परिवार यांनी केला आहे.

विशेष अतिथि म्हणून माजी मंत्री आ. शंकारराव गड़ाख, युवा नेते उदयन गडाख, जिल्हा परिषद सदस्य सुनील गड़ाख,हे हजर राहणार आहे. शनिवार दी.24 रोजी हभप. कारभारी महाराज पंडित यांचे सकाळी 9ते11 काल्याचे कीर्तनाने सागता होऊन महाप्रसादचे वाटप होणार आहे. मान्यवरच्या हस्ते द्वाजरोहन केले जाणार आहे.



## संजय गांधी निराधार योजना लोहा तालुकाध्यक्षपदी चंद्रसेन पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्र राज्याचे ग्राम विकास व पंचायत राज पर्यटन मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्या शिफारशीनुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या लोहा तालुका अध्यक्षपदी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य  पाटील यांची निवड झाली असून अशोक सोनकांबळे सुप्रिया सचिन शिरसागर एकनाथ तिडके सचिन कुदळकर यांची संजय गांधी निराधार योजनेच्या नवनियुक्त सदस्य पदी नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी काढले आहेत. लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्य दक्ष आमदार शामसुंदर शिंदे शेतकरी कामगार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा शेकापाचे मराठवाडा सहचिटणीस विक्रांत दादा शिंदे, खरेदी विक्री संघाचे सभापती स्वप्नील पाटील उमरेकर, उपसभापती श्याम अण्णा पवार, शेकाप ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे, शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बालाजी इसादकर यांनी संजय गांधी निराधार योजनेच्या नवनियुक्त अध्यक्ष व सर्व सदस्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# १५८ कुटुंबे घेणार वाडीधरणात जलसमाधी

## येणाऱ्या निवडणुकीत टाकणार आमदारांवर बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** गेल्या २० वर्षांपासून धरणात गेलेल्या घरांचा मोबदला, प्रकल्पग्रस्तांच्या सोयी सुविधा मिळत नसल्याने वाडी धरणात येत्या २१ तारखेला १५८ कुटूंब जलसमाधी घेणार असल्याचा इशारा वाडी गावचे लोकनियुक्त सरपंच सुवर्णसिंग गिरासे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. साक्रीरोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आज सकाळी ११ वाजता वाडी गावचे लोकनियुक्त सरपंच सुवर्णसिंग कोमलसिंग गिरासे, ललीत गिरासे, मोहनसिंग गिरासे, दिलीप बेडसे, सुनिल भिल यांनी पत्रकार परिषद घेवून आपली भुमीका मांडली. लोकनियुक्त सरपंच सुवर्णसिंग गिरासे म्हणाले वाडी ता.शिंदखेडा येथील गावठाण जागेतील गटनंबर १६५ व १६६ मधील ८१६३ चौ.मी. ३३०९ चौ.मी. असे एकूण ५१७२ चौरस मिटर क्षेत्र वाडी धरण क्षेत्रात बुडीत म्हणून गेले होते. शासनाने वाडी धरणासाठी भुसंपादन प्रक्रिया या दोघा गट नंबरसाठी सुरु केली होती. भुसंपादन प्रस्तावासाठी शासन फी देखील भरली होती. २००३-२००५ या कालावधीत भुसंपादनाची कार्यवाही सुरु होती. त्यानंतर मात्र अचानकपणे सरकारी कारभाराला सुरुवात झाली. भुसंपादन करत असलेली जमिन अतिक्रमीत ठरवली. या दोन्ही गटनंबरवरील १५८ कुटूंबांना केवळ सानुग्रह अनुदान देवून वाऱ्यावर सोडण्यात आले. वाडी गावचे गेल्या ७० वर्षांपासून रहिवास असलेले १५८ कुटूंब मोबदला आणि प्रकल्पग्रस्तच्या सुविधांपासून शासनाच्या अतिक्रमण ठरविण्याच्या निर्णयामुळे वंचीत ठरले. २० वर्षांपासून लढा सुरु आहे. २००३ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी देखील या १५८ कुटूंबांच्या बाजूनेच निर्णय दिला होता. परंतु जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश धुडकावून लावत सदर मालमत्ता केवळ सानुग्राह अनुदान दिले. महाराष्ट्र शासनाच्या धरणग्रस्त जनतेच्या हितासाठी असलेल्या पुर्नवसन धोरणाला धाब्यावर बसवुन मनमानी काही अधिकाऱ्यांनी केली आहे. शासनाने आता आमच्या सहनशिलतेचा अंत पाहु नये,वाडे गावातील धरणबाधीत पिडीत कुटूंबाला त्वरीत न्याय मिळावा या मागणीसाठी दि.२१ फेब्रुवारी रोजी आम्ही १५८ कुटूंब व कुटूंब प्रमुख वाडी धरणाच्या जलाशात समाधी घेणार आहोत. शासनाने आमच्या मुलांची व कुटूंबाची भरण पोषणाची व नोकरीची जबाबदारी घ्यावी असे सरपंच गिरासे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# तब्बल अठ्ठेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर गुरू-शिष्याचा भेटीचा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** शहरातील सत्तरच्या दशकातील शिक्षक असलेल्या गुरूंच्या निवासस्थानी त्यावेळच्या विद्यार्थ्यांनी येवून त्यांची भेट घेवून सपत्नीक सत्कार केला.. जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्याप्रसंगी गुरू आणि शिष्य भाऊक झाल्याचे दिसून आले.

नांदेड येथील प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या सन १९७४-७५ वर्षातील इयत्ता दहावी वर्गातील मित्रमंडळींनी एकत्र येत सध्यस्थितीस हयात आसलेल्या तत्कालीन गुरुजनांचा शोध घेवून मनोमिलन सोहळा आयोजित करण्याचे ठरविले. तारीख ठरली आणि नांदेड येथील एका आलिशान हॉटेलात शानदार सोहळा पार पडला.

प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर गुरुजींना गुरुदक्षिणा देवून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच त्यावेळचे गुणवत्ता यादीत आलेल्या नऊ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे ज्यांच्या लग्नाचा वाढदिवस आहे अशा विद्यार्थ्यांना सर्वांनी मिळून शुभेच्छा दिल्या.

तत्कालीन गुरुजींसह विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना जुन्या आठवणी काढल्या. त्याप्रसंगी कांहीं कल हास्यकल्लोळ तर कांहीं काळ गंभीर भाव निर्माण झाले. आठवणींना उजाळा देताना गुरुजी आणि विद्यार्थी भाऊक झाल्याचे दिसून आले. यावेळी तत्कालीन गुरुजी बाल कृष्ण फटाले, वसंतराव लव्हेकर, आर. एन. देशमुख, किशनराव हंगरगेकर, गणेश रामजी सोनाळे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक ॲड. शिरीष नागापुरकर यांनी केले तर आभार बाकलीवाल राजमल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रविन्द्र भारतीया, राजमल बाकलीवाल, शरद आडसुळ, उदय नंदनवंनकर, दीपक केसरी, लक्ष्मीकांत सांगविकर, अजय जकाते, विलास शिराढोनकर, प्रताप सिरसाट आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. तत्कालीन गुरुजी व्यंकटराव पांचाळ हे तब्येतीच्या कारणास्तव सदरील मनोमिलन सोहळ्यास उपस्थित राहू शकले नसल्यामुळे स्वतः विद्यार्थ्यांनी लोहा शहरातील पांचाळ गुरुजींच्या निवस्थानी येत त्यांचा सपत्नीक शाल व श्रीफळ देऊन सत्कार करून गुरुदक्षिणा दिली. गुरुदक्षिणेत दिलेली रोख रक्कम  सामाजिक कार्यासाठी दान देणार असा मानस तत्कालीन गुरुजी व्यंकटराव पांचाळ यांनी केला यावेळी विद्यार्थी दिलीप जगताप, श्याम संगी, दीपक केसरी, उदय नंदनवनकर, राजमल बाकलीवाल, शरद अडसूळ लोहा सराफा मार्केटमधील व्यापारी उत्तम कंधारकर एम एस चारी,संजय काटकर,अशोक पेडगुलवार, जगताप व परिवारातील सर्व सदस्य आदींची उपस्थिती होती.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात क्रांतिसूर्य सेवालाल महाराज जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय पहूर कसबे  विद्यालया मध्ये क्रांतीसुर्य संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. याप्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका कल्पना बनकर  होत्या तर हिवरसिंग  राठोड चरणसिंग राठोड या पालकांची  प्रमुख उपस्थिती लाभली. मयुरी राठोड ,नंदिनी राठोड, प्रियंका राठोड, या विद्यार्थीनींनी बंजारा गीत सादर करून सर्वांची मने जिंकून घेतली तर दुर्गा राठोड जागृती चव्हाण , राणी राठोड यांनी मनोगतातून क्रांतीसुर्य सेवालाल महाराज  यांच्या कार्याचा माहिती विशद केली .माधुरी बारी यांनी शिक्षक मनोगतातून सेवालाल महाराज यांच्या चरित्रावर प्रकाश टाकला. सुत्र संचालन राजेंद्र सोनवणे यांनी केले तर आभार हरीभाऊ राऊत यांनी मानले. या प्रसंगी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनिल पवार संदिप बनसोडे यांचे सहकार्य लाभले.



## प्रसिद्ध अभिनेत्री कविता चौधरी यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्री व निर्मात्या कविता चौधरी यांचे निधन झाले आहे. १५ फेब्रुवारीला हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कविता यांनी अभिनयसृष्टीत आतापर्यंत अनेक मालिका व जाहिरातींमध्ये काम केले आहे. दूरदर्शनच्या 'उडान' व 'योर ऑनर' या टीव्ही मालिकांची निर्मिती करून, त्यांनी मनोरंजन विश्वात वेगळी ओळख निर्माण केली होती.कविता चौधरी यांचे पुतणे अजय सायल यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या काही वर्षांपासून कॅन्सरने त्रस्त होत्या. त्यांच्यावर दीर्घकाळ उपचार सुरू होते. अमृतसरच्या पर्वती देवी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज (१६ फेब्रुवारीला) अमृतसर येथील शिवपुरीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कविता चौधरी यांना १९८९ मध्ये प्रसारित झालेल्या 'उडान' मालिकेमधून खरी ओळख मिळाली.

# सेवालाल महाराज यांची शिकवण समाजाला मार्गदर्शक : एस.व्ही. पाटील यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** पहूर येथील आर. टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रारंभी शाळेचे विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर भाषणे दिली. इयत्ता अकरावी कला शाखेच्या विद्यार्थ्यांनीनी  ..पारंपारिक वेशभूषेत व बोलीभाषेत गीत गायन केले. तसेच काही विद्यार्थीनींनी पारंपारिक नृत्य सादर करून संस्कृतीचे दर्शन करून दिले. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस व्ही पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की सेवालाल महाराज यांची शिकवण आजही समाजाला मार्गदर्शक व दिशादर्शक आहे . सामाजिक कार्यकर्ते तुकाराम चव्हाण यांची विशेष उपस्थिती लाभली. एम. एस. आगारे , व्ही. व्ही. बोरसे, आर. टि. देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शाळेचे पर्यवेक्षक  एस. आर. सोनवणे,  संदीप रोहीदास राठोड (उपसरपंच). पिंपळगांव कमानी, एम. बी. पवार.  एस.एस. पाटील शाळेचे वरीष्ठ लिपीक किशोर पाटील , विदया भालेराव , रंजना थोरात तसेच शाळेचे सर्व शिक्षक - शिक्षीका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व शाळेचे सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम सूत्रसंचालन व आभार एस. एस. भडांगे यांनी केले व राष्ट्रीय गीताने कार्यक्रम समारोप झाला.



# कोपरगावात दोन चोरटे अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची रब्बी पिके ऐन भरात आली असताना चोरट्यांनीं पाणबुडी विद्युत पंप चोरी करण्याचा धडाका सुरु ठेवल्याने शेतकरी हैराण झाले होते. त्यासाठी नव्याने दाखल झालेले पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी या चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी एक तपासी पथक नियुक्त केले होते.
त्या पथकास चोरटे शोधण्यात यश आले असून त्यांनीं आरोपी कृष्णा गंगाधर सानप (वय-३१), योगेश छगन माळी (वय- २६) दोघे रा.बत्तरपूर यांना अटक केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सुटकेचा श्वास टाकला आहे. कोपरगाव तालुक्यात चोरट्यांनी मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना विविध चोऱ्या करून वेठीस धरले होते.
याआधी तालुका पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक पदावर दौलतराव जाधव असताना त्यांनी एक टोळी पकडली होती त्यात सदर चोरटे विद्युत पंपाची तांब्यांची तार काढून कोपरगाव शहरातील एका इलेक्ट्रिक दुकानात विकत होते. त्यांनी त्याचा छडा लावून चोरटे जेरबंद केले होते. त्यांनी जेऊर कुंभारी,जेऊर पाटोदा, सोनेवाडी, डाऊच खुर्द आदी परिसरात धुमाकूळ घातला होता.त्यानंतर हि दुसरी टोळी पकडली गेली आहे. यातील फिर्यादी संपत राजाराम गरुड यांनी याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात १० हजार रुपये किमतीचा पाच अश्व शक्तीचा विद्युत पंप चोरीचा गुन्हा क्रं.३७/२०२४ भा.द.वि.कलम ३७९ अन्वये हा दाखल केला होता. त्यानुसार पोलीस निरीक्षक यांनी यासाठी तपासी पथक नियुक्त केले होते. त्यांनी कसून शोध घेतला असता त्यांना वरील आरोपी संशयास्पद आढळून आले होते. त्यांना ताब्यात घेऊन पोलिसी हिसका दाखवला असता त्यांनी पोपटासारखी कबुली दिली होती. त्यांना पोलिसांनी अवघ्या बारा तासात जेरबंद केले आहे. या कामगिरीबद्दल पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दरम्यान या पथकात पोलीस निरीक्षक कोळी यांच्या मर्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप वाखुरे, पो.हे. कॉ.संदीप बोटे,पो.कॉ.अंबादास वाघ, नवनाथ गुंजाळ, पोलीस नाईक रामा साळुंके आदींनी महत्वपूर्ण भुमीका निभावली आहे.



ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या, इलेक्ट्रिक मोटर, शेतीचे स्प्रिंकलर सेट, मोटारच्या केबल, दुचाकी मोटरसायकल आदींच्या चोऱ्यांचे प्रमाण खूप वाढले आहे पोलिसांनी अजून मोहीम तीव्र करून चोरटे गजाआड करुन शेतकऱ्यांना दिलासा देणे गरजेचे आहे .
**राजेंद्र पोपटराव होन, शेतकरी चांदेकसारे .**

# नियम धाब्यावर बसवून डान्सबार सुरूच

## पोलीसांचेच संरक्षण : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मुंबईमध्ये ऑर्केस्ट्राच्याआड सर्रास डान्स बार चालवले जात आहेत. नियम धाब्यावर बसवून पहाटे पाचपर्यंत डान्सबार सुरू आहेत. मुंबईतील या डान्सबारना पोलीसांचेच संरक्षण आहे. या डान्सबारवर छापे टाकून कडक कारवाई करावी, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, बारचालकांनी सिंडिकेट तयार केले असून, सिंडिकेटमधील बार चालक महिन्याला लाखो रूपये जमा करीत आहेत. जमा झालेल्या रकमेतून पोलीसांना, पोलीसांच्या खबऱ्यांना, स्थानिक गुंडांना हफ्ते दिले जात आहेत. त्यामुळे सिंडिकेटमधील डान्सबारवर कोणतीही कारवाई केली जात नाही. डान्सबार पहाटेपर्यंत चालू आहेत. याबाबत स्थानिकांनी पोलीसांकडे तक्रार देऊन देखील डान्सबारवर कोणतीही कारवाई केली जात नाही. याउलट सिंडिकेटमधील बारचालक तक्रारदारालाच धमक्या देत आहेत, मारहाण करीत आहेत. यासंदर्भातील अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे मुंबईतील ऑर्केस्ट्राच्याआड सुरू असलेल्या डान्सबारवर छापे टाकून कडक कारवाई करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

# कन्नडमध्ये संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती गुरुवारी (दि.१५) फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने क्रांतिकारी सद्गुरु श्री संत सेवालाल महाराज यांची भव्य शोभायात्रा काढत वेशभुषा, सांस्कृतिक देखावा, गोर गीत, दुचाकी बाईक रॅली आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांसह, शासकीय सेवेत नोकरी करणाऱ्यांचा सत्कार, महाप्रसाद वाटप यासह अन्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





क्रांतीकारी संत सेवालाल महाराज जयंती उत्सव समिती कन्नड व सकल बंजारा समाज बांधवांच्या वतीने सकाळी दहा वाजता शोभायात्रा व दुचाकी रॅली काढण्यात आली. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले आणि संत सेवालाल महाराज की जय,असा जयघोष करत शोभायात्रेला प्रारंभ झाला. शहरातील गिरणी ग्राउंड येथून निघून छत्रपती शिवाजी कॉलेज गेट, हिवरखेडा नाका, पिशोर नाका, शासकीय विश्रामगृह, अण्णाभाऊ साठे चौक येथून परत गिरणी ग्राउंड येथे येऊन पदयात्रा फेरीची सांगता झाली. तसेच गिरणी ग्राउंड येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. उपस्थित सर्वच मान्यवरांनी सेवालाल महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकीत समाज बांधवांना मार्गदर्शन केले.
यावेळी या कार्यक्रमास आमदार उदयसिंग राजपूत, शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार, माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव, डॉ.संजय गव्हाणे, केशव राठोड, अनिल चव्हाण, समाजसेवक प्रा.लखन चव्हाण, वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष देविदास राठोड, अरविंद राठोड, प्रथम जाधव, रितेश राठोड, सत्यम राठोड यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एम.आय.टी. रोटेगावच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** एम.एस.बी.टी.ई. मुंबई यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या पॉलिटेक्निकच्या हिवाळी परीक्षा-2023 मध्ये एम.आय.टी.पॉलिटेक्निक रोटेगाव येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून संस्थेच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. यावेळी संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील यांनी सांगितले की, यात संस्थेच्या अंतिम वर्षातील सर्व शाखांचा निकाल 100% लागला असून यावर्षीपासून प्रथम वर्षासाठी लागू करण्यात आलेल्या 'के स्कीम'चा निकाल देखील उत्साहवर्धक आहे, असे सांगितले. शाखानिहाय निकालामध्ये ॲग्रीकल्चरल इंजिनीअरींग विभागातून कु.पायल मतसागर 88.00%, चैतन्य भुजाडे 83.63%, उद्धव दुशिंग 78.13% (तृतीय वर्ष), कु.भाग्यश्री काळे 77.65%, रोहन सूर्यवंशी 76.24%, कु.शिवानी कुमावत 75.77% (द्वितीय वर्ष), कु.सभ्यता श्रीखंडे 79.53%, शिवराज शेळके 78.35%, श्याम शेजवळ 78.12% (प्रथम वर्ष) गुण घेऊन यश संपादन केले. सिव्हील इंजिनीअरींग विभागातून कु.सज्ञा गणोरे 86.50%, कु.अश्विनी काळे 86.4%, रोहन घायवट 80.26% (तृतीय वर्ष), ईश्वर गायकवाड 88.11%, कु.साक्षी कुहिले 86.33%, कु.स्नेहल मतसागर 84.89% (द्वितीय वर्ष), कु.मानसी मतसागर 83.53% (प्रथम वर्ष) गुण घेऊन यश संपादन केले. कंप्युटर इंजिनीअरींग विभागातून वैभव कदम 88.33%, कु.श्वेता जाधव 87.00%, सागर चव्हाण 86.11% (तृतीय वर्ष), कु.ऐश्वर्या घुसिंगे 88.00%, कु.अमृता बनकर 87.60%, कु.राधिका कोटकर 84.80% (द्वितीय वर्ष), योगीराज कदम 92.47%, कु.ऋतुजा महेर 91.88%, कु.आर्या कदम 87.18%, कु.नूतन दळवी 86.47%, कु.आरती नवले 86.35%, कु.समृध्दी साळुंके 85.06% (प्रथम वर्ष) गुण घेऊन यश संपादन केले. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली-कम्युनिकेशन इंजिनीअरींग विभागातून तुषार दाभाडे 89.68%, कु.पल्लवी कठाळे 89.33%, कृष्णा जाधव 85.79% (तृतीय वर्ष), अजय उगले 83.88%, कु.तेजल गोरे 82.00%, कृष्णा राहणे 78.94% (द्वितीय वर्ष), संकेत फाळके 84.12%, पार्थ गरड 82.59%, एहतेशाम खान 81.29% (प्रथम वर्ष) गुण घेऊन यश संपादन केले. मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातून उमेश ठोंबरे 90.57%, रितेश रोकडे 88.67%, सुदर्शन सुंब 84.19% (तृतीय वर्ष), गौरव पठारे 86.11%, उमेश तायडे 83.26%, कु.अपर्णा मतसागर 82.32% (द्वितीय वर्ष), कृष्णा गोरे 80.35%, सत्यम वाघ 80.24%, कृष्णा म्हस्के 78.94% गुण घेऊन यश संपादन केले. संथेचे प्राचार्य प्रा.पाटील, अधिकारी प्रा.आव्हाळे, प्रा.सोनावणे, सर्व विभाग प्रमुख प्रा.पाठक, प्रा. जोशी, प्रा.भिसे, प्रा.राम, प्रा.जाधव, प्रा.शहाणे तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा. डॉ.वाय.ए.कवडे सर, महासंचालक प्रा.मुनिषजी शर्मा सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या आहेत.

# सोयाबीन, कापसाचा भाव घसरला : प्रा. मदनभाऊ डोखळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा यंदा सोयाबीन, कापसाचे भाव कोसळल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.
मागील वर्षीप्रमाणे शेतकरी कापसाचा साठा करीत आहेत. मात्र, किमान हमीभावही मिळण्याची शक्यता नसल्यामुळे कापूस व सोयाबीनचा साठा वाढणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कापूस किमान सात हजार रुपये आणि सोयाबीनची चार हजार २०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी सुरू आहे. जिल्ह्यात खरीप हंगामात पावसाने दडी मारल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. कापूस, सोयाबीन व मका पिकाला मोठा फटका बसला होता. पिकांची उत्पादकता घटल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. रब्बी पिकांच्या पेरणीसाठी पुरेसा पाऊस झाला नसल्याने रब्बी पिकांवरही परिणाम झाला आहे. पिकांचा उतारा कमी आल्यामुळे पुरेसे उत्पन्न मिळण्याची शक्यता नाही. या परिस्थितीत शेतमालास हमीभाव मिळणे अपेक्षित असताना शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. मागील काही दिवसांत सोयाबीनचे दर कोसळले आहेत. व्यापारी सोयाबीनची प्रतिक्विंटल चार हजार ते चार हजार ३०० रुपये दराने खरेदी करीत आहेत. कापूस सात हजार रुपये प्रतिक्विंटल दराने विक्री सुरू आहे. कापूस दर दहा हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत जाण्याची शेतकरी वाट पाहत आहेत. मात्र, मागील वर्षीप्रमाणे पहिल्यापासूनच कापसाचे दर घटलेले आहेत. परिणामी, शेतकऱ्यांनी कापसाचा साठा केला आहे. बाजारपेठेत कापसाचे दर वाढल्यानंतर विक्री करण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला आहे. आयात निर्यात धोरणाचा फटका कृषी क्षेत्रातील अर्थव्यवस्थेला बसला आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन योग्य धोरणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी प्रा मदन डोखळे सामाजिक कार्यकर्ते डाभा यांनी केली आहे.बाजार समितीत सोयाबीन दर किमान चार हजार २२६ आणि कमाल दर ४ हजार २५१ रुपये प्रतिक्विंटल आहे. खत, किटकनाशके आणि मजुरीचा खर्च पाहता कापूस आणि सोयाबीन पीक शेतकऱ्यांसाठी खर्चिक झाले आहे. लागवड आणि संगोपनावरील खर्च आणि बाजारातील दर यांचा ताळमेळ घालणे कठीण आहे. मराठवाड्यात कापूस आणि सोयाबीन पिकाचे सर्वाधिक क्षेत्र आहे. या दोन्ही पिकांचे घसर- लेले दर शेतकऱ्यांसाठी तापदायक ठरले आहेत. निवडणुका जवळ येतील तसे शेतकऱ्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होणार आहे. ग्राहककेंद्री राजकारण, कापसाचा शेतकरी संघटीत नसतो. कांदा, ऊस, द्राक्ष शेतकरी एकत्र येत नाहीत.

# आ. जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपुरात तीन दिवसीय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 1975 साली चंद्रपूरातील कोहिनूर तलावाच्या मैदानावर जगप्रसिद्ध पैलवान दारासिंग रंधावा आणि झिबिस्को यांची लढत झाली होती. त्यानंतर आता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून तब्बल 48 वर्षाने महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख आणि हरियाणा केसरी जस्सा (छोटा) या जगप्रसिध्द पैलवांनाची लढत 17 फेब्रुवारीला शनिवार महाकाली मंदिराच्या पटांगणात होणार आहे. हा सामना सांयकाळी 8 वाजता सुरु होणार आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत कबड्डी, बॉडी बिल्डिंग स्पर्धा पार पडली आहे. 16 फेब्रुवारी पासून चंद्रपूर शहर तालीम संघ यांच्या सहकार्याने तिन दिवस राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महाकाली मंदिर येथील पटांगणात सदर स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत राज्यभरातील कुस्ती पट्टू सहभाग घेणार आहे. ही स्पर्धा पूरुषांचे 9 वजन गट आणि महिलांचे 8 वजन गट अशा ऐकून 17 वजन गटात सदर स्पर्धा पार पडणार आहे. मागील वर्षीची अहमद नगर येथील महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फंड, आंतरराष्ट्रीय कुस्तीगीरी सोनाली मंडलीक, उपमहाराष्ट्र केसरी कौतुक धापडे, विजय शिंदे, रोहन रंदे आदी नामांकित कुस्तीपट्टु सदर स्पर्धेत सहभागी होणार आहे.



**महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख विरुध्द हिरयाना केसरी जस्सी छोटा :**
श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवात आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख विरुध्द हरीयाना केसरी जस्सी ( छोटा ) यांची विशेष लढत रंगणार आहे . तर अर्जुन पूरस्कार प्राप्त दिव्या काकरण विरुध्द पंजाब व हरियाणा केसरी जसप्रीत कौर यांची लढत रंगणार आहे . या स्पर्धेकरीता महान भारत केसरी योगेश बोंबाळे यांची उविशेष उपस्थिती राहणार आहे .

महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख, हरियाणा केसरी जस्सी छोटा ,अर्जुन पुरस्कार प्राप्त दिव्या काकरण, पंजाब हरियाणा केसरी जसप्रीत कौर, महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फंड ,आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सोनाली मंडलिक, उपमहाराष्ट्र केसरी कौतुक धापडे नामांकित कुस्तीपटू विजय शिंदे, रोहन रंदे आदि नामवंत कुस्तीपटू राहणार उपस्थित , यांच्यात रंगणार सामने

# पाणी प्रश्न सोडवण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ वचनबद्ध

## कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे : गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत पाणी व्यवस्थापन; आव्हाने व उपाय कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सेवा क्षेत्रावर असलेला 60 टक्के जीडीपी जर कृषीमध्ये आणायचा असेल तर कृषीला समृद्ध करण्याशिवाय पर्याय नाही. कृषी समृद्ध तेव्हाच होऊ शकते, जेव्हा कृषीला बारमाही पाणी मिळेल तेव्हा हे बारमाही पाणी मिळण्याचे तंत्र गोसिखुर्दच्या रूपाने त्याचे अवलंबन करण्याची संधी पूर्व विदर्भाला मिळालेली आहे. आपण देशापुढे मॉडेल ठेऊ शकतो. नीट पाणी मिळाले, योग्य पाणी मिळाले, तर कृषी पुन्हा सकल घरेलू उत्पादनामध्ये 60 टक्के वाटा उचलू शकते. जगात असलेली प्रगत टेक्नॉलॉजी वापरून पाणी वापराचा प्रश्न सोडवण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ वचनबद्ध आहे. यासाठी सेवावर्धिनी संस्था आपल्या सोबत आहे .शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. हे जगाला दाखवून देऊ आणि एक नवे मॉडेल जगासमोर ठेवू असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले. विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या हेतूने महाराष्ट्रातील गोसेखुर्द प्रकल्पाच्या क्षेत्रातील पाणी वापर संस्था अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि सेवावर्धिनी संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत पाणी व्यवस्थापनः आव्हाने व उपाय" या विषयावर , नुकतीच सिध्दार्थ सभागृह, चंद्रपूर वन प्रशासन, विकास, संशोधन व व्यवस्थापन प्रबोधिनी, मूल रोड, चंद्रपूर येथे एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. प्रमुख उपस्थिती म्हणून प्र-कुलगुरु ,डॉ. श्रीराम कावळे,समनव्यक तसेच विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, सचिव, सेवावर्धिनी संस्था, पुणे, सोमदत्त पटवर्धन, कार्यकारी अभियंता, पाटबांधारे ए. व्ही. फरकाडे आदींची उपस्थिती होती.

आपल्या मनोगतात सेवावर्धिनी संस्था, पुणे , सोमदत्त पटवर्धन यांनी संस्थेची भूमिका विशद केली. या एकदिवसीय चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात निवृत्त कार्यकारी अभियंता , जलसंपदा विभाग, किशोर वरंभे यांनी 'लोकसहभागीय पाणी व्यवस्थापन-कायदा व लोकांच्या जबाबदाऱ्या ' या विषयावर प्रकाश टाकत २००५ च्या पाणी व्यवस्थापन कायद्यात झालेला बदल , पाणी वापर संस्थेची कामे, पाण्याचा पुनर्वापर करणे, कमी पाण्यामध्ये जास्त पीक घेणे, पर्यावरणाचा समतोल राखणे, सिंचन क्षेत्राची वाटचाल याचे अभ्यासपूर्ण विवेचन त्यांनी केले. या सत्राचे अध्यक्षीय मनोगत राजेंद्र देशकर यांनी केले. संचालन गोंडवाना विद्यापीठाच्या जनसंवाद विभागाचे स. प्रा. रोहित कांबळे यांनी केले.

**दुसऱ्या सत्रात कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग** :ए.व्ही.फरकाडे यांनी 'गोसेखुर्द प्रकल्पाचे विस्तृत विवेचन' या विषयावर विविधांगी रूपाने माहिती दिली .या सत्राचे संचालन मराठीचे स.प्रा.अमोल चव्हाण यांनी तर तिसऱ्या सत्राचे मत्स्य व्यवस्थापन तज्ञ तथा माजी सदस्य, सिंचन आयोग महाराष्ट्र डॉ. उल्हास फडके, यांनी 'पाणी वापर संस्था सक्षमीकरण -उद्देश व वास्तव ' या विषयावर पाणी वापर संस्थांचे चित्र कसे बदलू शकते. पिकांचे योग्य नियोजन कसे करता येइल. या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले .अध्यक्षीय मनोगत सचिव सेवावर्धिनी, पुणे सोमदत्त पटवर्धन यांनी केले. या कार्यशाळेत सहभागी झालेले पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी, सदस्य आणि शेतकरी यांनी पाणी वापरा संदर्भात तसेच पाणी वापर संस्थांच्या अडी-अडचणी यावर वक्त्यांच्या उपस्थितीत चर्चा करून त्यावर मंथन करण्यात आले. प्रास्ताविक कार्यशाळाचे समन्वयक तसेच अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ.अनिल चिताडे यांनी, संचालन रसायनशास्त्र विभागाचे स.प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे यांनी तर आभार सचिव सेवा वर्धिनी संस्था पुणे, सोमदत्त पटवर्धन यांनी मानले. या कार्यशाळेला वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. जयेश चक्रवर्ती, शहरातील गणमान्य नागरिक, पाणी वाटप संस्थेचे पदाधिकारी, सदस्य तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# किड्स किंग्डम अकॅडमीमध्ये स्पोर्टस डे निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन

## विद्यार्थ्यांचे पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**गणेशवाडी :** १५ फ्रेबुरवारी रोजी किड्स किंग्डम अकॅडमी मध्ये भव्य दिव्य स्पोर्ट्स डे साजरा करण्यात आला, या प्रसंगी प्रमूख म्हणुन डॉ. निवेदिता ताई गडाख पाटील, उपस्थितीत होत्या. तसेच अन्नपूर्णा बंग, सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके, शिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक. रामचंद्र कर्पे, उपस्थित होते. स्पोर्ट्स डे चे प्रमूख आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे ड्रिल सादरीकरण केले. तसेच पालकांच्याही यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रमूख पाहुण्याच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी संस्थेचे सचिव सचिन बंग, मुख्याध्यापिका किर्ती बंग आणि शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत फटाले सर ,पल्लवी बेल्हेकर मॅडम कविता दरंदले मॅडम यांनी केले.

# बल्लारशा येथून मुंबईसाठी दररोज रेल्वे

## हंसराज अहीर यांच्या प्रयत्नांचे फलित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** येथून मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे नसल्याने जिल्हयातील अनेक विद्यार्थी - पालक व व्यापा-यांना ईतर पर्यायाचा अथवा नागपूर येथून रेल्वे प्रवास सुरू करावा लागत होता. चंद्रपूर येथून मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे असावी अशी विविध स्तरावरून मागणी होत असतांना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी मागणीची गांभीर्याने दखल घेत दिल्ली येथे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत थेट बल्लारशा येथून मुंबई व पुणे करिता रेल्वे सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून रेल्वे विभागाने हंसराज अहीर यांच्या मागणीचे संदर्भ देत दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी यासंबंधीचे पत्र विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर यांना जारी करून रेल्वे सुरू करण्यासाठी व्यवहार्यता टिप्पणी सादर करण्याच्या सुचना केल्या आहेत.



दि. १३ डिसेंबर २०२३ रोजी हंसराज अहीर यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत काझीपेठ पुणे ट्रेन न २२१५१/५२ बल्लारशा येथून सुरू करावी अशी मागणी केली होती. तसेच नंदीग्राम एक्सप्रेस ट्रेन नं. ११४०१/०२ ही मुंबई येथून आदिलाबाद पर्यंत येत असतांना या रेल्वेचे विस्तारीकरण करून बल्लारशा पर्यंत सुरू करावी या मागणीसह चर्चा केली. नंदीग्राम या रेल्वे च्या मार्गात भद्रावती, वणी, पिंपळखुटी या ठिकाणी थांबणार आहे. अहीर यांच्या या चर्चेला अनुसरून मध्य रेल्वे विभागाने सदर पत्र विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर यांना जारी केले आहे. या पत्रान्वये बल्लारशा येथून मुंबई करिता दररोज तर पुणे करिता आठवडयातून ३ दिवस रेल्वे धावणार आहे. मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे सुरू होणार असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये चैतन्याचे वातावरण असून यात्रेकरूंसाठी ही रेल्वे विशेष सुविधेची ठरणारी आहे. याबाबत अधिक माहिती देत हंसराज अहीर यांनी सांगीतले की, सदर रेल्वे गाडया जलद गतीने सुरू करण्यासाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक नागपूर यांच्याशी चर्चा केली असून त्वरीत व्यवहार्यता टिप्पणी मध्य रेल्वे मुंबई कार्यालयास सादर करण्याची सुचना केली आहे. या रेल्वे सुरू होत असतांना चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ जिल्हयातील प्रवाशी, विद्यार्थी, पालक, व्यापारी व यात्रेकरू यांना भरिव फायदा होणार असून हंसराज अहीर यांचे हे प्रयत्न चंद्रपूर जिल्हयातील रेल्वे सुविधेमध्ये नक्कीच मैलाचा दगड ठरेल असा सार्थ विश्वास चंद्रपूर रेल्वे संघर्ष समितीच्या वतिने व्यक्त करून हंसराज अहीर यांचे आभार मानले आहे.





# एनएमएमएस परीक्षेत फुले विद्यालयाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**जिंतूर :** तालूक्यातील वस्सा येथिल महात्मा फुले विद्यालयाने राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. यात प्रस्तुत विद्यालयाचे 24 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी कोणतीही स्पर्धा असो किंवा परीक्षा असो स्वतः रात्रंदिवस अभ्यास करतात, वेळोवेळी त्याचा सराव करतात. त्यामुळे प्रत्येक स्पर्धा व विविध परीक्षेत महात्मा फुले विद्यालयाचे विद्यार्थी यशस्वी होतात. एनएमएमएस परीक्षेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा विशेष कार्यक्रमात महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सचिव रामभाऊ राऊत, प्राचार्य लक्ष्मण बकरे, मुख्याध्यापक सुरेश तावडे, कृष्णा राऊत आदिंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांना शंभर पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए. शेख यांनी केले तर देविदास नाईक यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# येवला नगरपालिकेला स्वातंत्र्यसेनानी तात्या टोपेंच्या जन्मस्थळाचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**विलास कांबळे (देवांग)**

**येवला :** सन १८५७ च्या उठावातील प्रसिद्ध सेनापती स्वातंत्र्यवीर तात्या टोपे यांचा १६ फेब्रुवारी १८१४ या दिवशी त्यांचा जन्म झाला आहे तात्या टोपे यांचा येवल्यात अर्धकृती पुतळा उभारण्यात आला आहे दरवर्षी तात्या टोपे यांच्या जन्मदिनी या पुतळ्याची साफसफाई करण्यात येऊन आदरांजली वाहिली जाते मात्र यावर्षी या थोर स्वातंत्र्य सेनानीचा येवलानगर पालिकेला विसर पडला असून तात्या टोपे यांच्या पुतळा परिसरात साफसफाई करण्यात आलेली नाही येवला नगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे तात्या टोपे यांचा (१६ फेब्रुवारी) जन्मदिवस असून सुद्धा या ठिकाणी



येवला नगरपालिका प्रशासनाने कोणतीही स्वच्छता केली नसल्याची बाब पत्रकार सुदर्शन खिल्लारे यांच्या लक्षात आली सोशल मीडियावर याची चर्चा होताच तात्या टोपे यांच्या पुतळ्यासह परिसराची साफसफाई करण्यात आली दुपारी केलेल्या साफसफाई नंतर फोटोशेषनच्या या घाईगडबडीत साधा दहा रुपयांचा हार देखील तात्या टोपे यांना अर्पण करण्यात आला नाही येवला नगरपालिकेच्या या बेजबाबदारपणाचा येवल्यात सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे येवला नगरपालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसून तात्पुरत्या स्वरूपात देशमुख यांच्याकडे पदभार सोपवण्यात आला आहे उपमुख्याधिकारी हे पद शोभेचे पद झाले असून नागरिकांच्या समस्यांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे तात्या टोपे यांच्या बद्दल अनास्था दाखवणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला नागरिकांच्या समस्यांचे कोणतही सोयरसुतक नसल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत सेनापती तात्या टोपे यांनी १८५७ मध्ये सैन्याची जमवाजमव करून इंग्रजांशी मुकाबला केला अशा या थोर स्वातंत्र्यसैनिकाबद्दल अनास्था दाखवल्याबद्दल संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.



आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** बंजारा समाजाचे धर्मगुरू संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची जयंती रामकृष्ण विद्यामंदिर व व. स्व. भास्कररावजी शिंगणे माध्यमिक विद्यालय, साईनगर देऊळगाव राजा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापीका एम.आर. म्हस्के, मुख्याध्यापक जी.व्ही. देशमुख तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष एल.एस. कोल्हे व प्रमुख पाहुणे के. टी. चव्हाण यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन केले. एस.डी. पाटोळे यांनी संत सेवालाल महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. जी.व्ही. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रेम जरपोतवार चंद्रपूररत्न पुरस्काराने सन्मानित

## पार्थशर समाचारच्या तिसऱ्या वर्धापन दिनी पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** सामाजिक बांधिलकी जोपासत,सामाजिक कार्य करणारा जुनोना येथील प्रेम नामदेव जरपोतवार यांना चंद्रपूर रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. प्रेम जरपोतवार याने जुनोना गावात "अभ्यासवर्ग-शाळे नंतरची शाळा" उपक्रम सुरु करून विद्यार्थांना शिक्षणाचे धडे दिले. कोरोना काळात जनजागृती, विद्यार्थ्यासाठी अभ्यास वर्ग, महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम, ग्रामस्वछता, शासनाच्या विविध योजनाची जनजागृती, वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण, आरोग्य शिबीर, रक्तदान, तसेच विविध नामांकित संस्थांमध्ये स्वयंसेवक म्हूणन कार्य केले होते. नेहमी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देऊन त्यांनी कार्य केलेले आहेत. याच कार्याबद्दल प्रेमला सामाजिक कार्यासाठी शिक्षणप्रेमी पुरस्कार, आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल समाजरत्न पुरस्कार, महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणार मिस्टर एसआरएम पुरस्कार मिळाला आहे. इतकेच नाही तर २०२३ च्या राज्यस्तरीय युवा संसदमध्ये मुंबई येथे चंद्रपूर जिल्ह्याचे आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे प्रतिनिधित्व केले आहेत. सध्या कलाम फॉउंडेशन, चंद्रपूर या नावाने संस्था स्थापन झाली असून त्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत आहे. याच सामाजिक कार्याची दखल घेऊन विदर्भातील प्रसिद्ध पार्थशर समाचारच्या वतीने २०२४ या वर्षीचा चंद्रपूर रत्न पुरस्काराने प्रेम जरपोतवार यांना सन्मानित करण्यात आले. पार्थशर समाचारच्या तिसऱ्या वर्धापन दिनी एनडी हॉटेल, चंद्रपूर येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. प्रेमने आपल्या यशाचे श्रेय आई, वडील, बहीण,भाऊ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री कापसे, प्रा. डॉ किरणकुमार मनुरे,सर्व प्राध्यापक वृंद, कलाम फॉउंडेशनचे सदस्य, गावकरी यांना दिले आहेत.

# वेरूळ येथे सेवालाल महाराजांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ येथे सेवालाल महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वेरूळ तालुका खुलताबाद येथे सेवालाल महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत वेरूळ, प्रताप तांडा, वेरूळ तांडा, आखातवाडा तांडा या ठिकाणी संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. तसेच सायंकाळी प्रताप तांडा व वेरूळ तांडा येथून बंजारा समाजातील महिला पुरुषांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करत डोक्यांवर कळस घेऊन तांड्या पासून ते मालोजीराजे भोसले गढी पर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी बंजारा समाजातील महिला पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी उपसरपंच विजय राठोड, ग्रा. पं. सदस्य चंदू राठोड, कलीबाई हंसराज चव्हाण, मुलचंद चव्हाण, दिगंबर राठोड, शिवलाल राठोड, राजेश मदन आडे, चुन्नीलाल आडे, सुभाष चव्हाण यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






# डॉक्टर्स क्रिकेट लीग स्पर्धेत जेडीए स्पार्टन संघ तिसरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियमवर नुकत्याच पार पडलेल्या डॉक्टर्स क्रिकेट लीग स्पर्धा २०२४ मध्ये जिंतूरच्या जे डी ए स्पार्टन क्रिकेट संघाने तिसरा क्रमांक पटकाविला त्यांना रोख अकरा हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. दि ८ /२ २२४ ते ११/२/२४ या दरम्यान झालेल्या स्पर्धेत एकुण १२ संघ सहभागी झाले होते त्यापैकी परभणीच्या निमा संघाने प्रथम व आय एम एस संघाने द्वितीय तर जिंतूर डॉक्टर्स असोसिएशनच्या जे डी ए स्पार्टन क्रिकेट संघाने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन तिसरा क्रमांक पटकाविला.
समारोपीय कार्यक्रमात मंचावर उपस्थित मान्यवर डॉ. सुधीर काकडे,डॉ. शेखर इंगळे, डॉ इरफान पटेल, डॉ . अभिजित चिद्रवार व डॉ. सचिन कदम यांच्या शुभहस्ते तिसऱ्या क्रमांकाचे विजयी पारितोषिक रोख अकरा हजार रुपये आणि चषक जे डी ए स्पार्टन क्रिकेट संघाचा कर्णधार डॉ .शिवप्रसाद सानप व उपकर्णधार डॉ. गजानन जाधव आणि टीममधील डॉ रुपेश तडकसे , डॉ किशोर घुगे, डॉ श्रीनिवास घुगे , डॉ सचिन जायभाये, डॉ. अतुल जाधव , डॉ . गंगाधर ढाकरे , डॉ.गजानन नव्हाट, डॉ संतोष घुगे , डॉ अभिजीत चवंडके, डॉ . शैलेश राठोड, डॉ अविनाश चवंडके, डॉ भागवत सांगळे , डॉ कृष्णा घुगे इ सर्व खेळाडूंना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील उत्कृष्ट बॉलर म्हणून डॉ गजानन जाधव यांची निवड झाली. या अगोदर कर्णधार डॉ शिवप्रसाद दत्तराव सानप यांनी जे डी ए स्पार्टन क्रिकेट संघाला सर्व खेळाडूंच्या सहकार्याने दोनदा प्रथम व आज तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावुन दिलेले आहे. या विजयाबद्दल जिंतूर डॉक्टर्स असोसिएशन मधील सर्व डॉक्टर्सनी व सर्व पत्रकार बधुंनी तसेच श्री कैलासराव घुगे, श्री नामदेव राठोड, श्री शेषराव जाधव , राम राठौर , श्याम राठौर, गुरु देबाजे , प्रभुदेवा वैजनाथ घुगे यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# देऊळगाव राजा येथे संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज यांच्या ३८५ व्या जयंतीनिमित्त शहरातून मिरवणूक करण्यात आली. यावेळी सादर करण्यात आलेले महिलांचे नृत्य आकर्षण ठरले. यानिमित्त बस स्थानक चौकात संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून भोग देण्यात आले. तदनंतर संत सेवालाल महाराज आणि मरियामाई यांची आरती व प्रसादाचे वाटप करण्यात आले.

बंजारा समाजाची वेशभूषा परिधान करून लहान मुली महिला व युवकांनी वाजत गाजत मिरवणूक काढली.यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. बस स्थानक चौकात मिरवणुकीची सांगता झाली त्यावेळी सहभागी महिलांनी सादर केलेले महिला नृत्य सदर मिरवणुकीचे आकर्षण ठरले. जयंती उत्सवा दरम्यान माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर, काँग्रेस नेते मनोज कायंदे,भाजप ओबीसी फ्रंटचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुनील कायंदे, राष्ट्रवादीचे नेते गणेश सवडे,दत्ता काळे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख दीपक बोरकर,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेश इंगळे, आधी मी संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.संत सेवालाल जयंती निमित्त बंजारा समाजातील श्रीराम राठोड, प्रल्हाद राठोड,सुरेश चव्हाण,शंकर राठोड,गणेश आडे,मधुकर पवार,दशरथ राठोड,संजय राठोड. राजेंद्र राठोड,संजय चव्हाण,पी.डी. राठोड बबन चव्हाण, रामराव राठोड, भारत राठोड, नितीन चव्हाण,गणेश जाधव,गजानन राठोड आदींसह समाजातील जेस्ट नवं युवक महिला मोठया प्रमाणात उपस्थित होते. जयंती उत्सवाच्या यशस्वीते साठी सर्व बंजारा समाज बांधवानी परिश्रम घेतले.



# वाचन संस्कृती वाढवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजे

## आमदार विक्रम काळे : वाचनाचे महत्त्व आजच्या काळातही टिकून

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** डिजिटल क्रांती झाली असली तरी वाचनाचे महत्त्व आजच्या काळात टिकून आहे. वाचनाची सवय कमी होत असून ही चिंतेची बाब आहे. मात्र वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी ग्रंथालय चालकासह सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्या विद्यमाने आयोजित 13 व 14 फेब्रुवारी 2024 रोजी समता दर्शन वाचनालयाच्या सभागृहात आयोजित छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव 2023 च्या समारोप च्या प्रसंगी ते बोलत होते.

या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञान स्रोतकेंद्राचे माजी संचालक डॉक्टर धर्मराज वीर हे होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक ऋषिकेश कांबळे, अशोक कुंडलिक अतकरे, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, माहिती अधिकारी मिलिंद दुसाने,सेवा निवृत्त सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. रा.शं. बालेकर, मसापाचे कुंडलिक आतकरे, गुलाबराव मगर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.विक्रम काळे म्हणाले की शिक्षक आमदार आणि ग्रंथालय याची जवळची नाते आहे. त्यामुळे मला ग्रंथालय चळवळीबद्दल प्रचंड आवड असून पन्नास टक्के अनुदानावरून शंभर टक्के करणे तसेच ग्रंथालयाचा दर्जा वाढ व्हावा यासाठी आपण मुख्यमंत्र्याकडे आळंदी येथे होणाऱ्या ग्रंथालय अधिवेशनामध्ये मागणी करणार असल्याचे सांगून आ.काळे म्हणाले की, करोनाने खूप काही शिकवले त्यातून चांगल्या, वाईट दोन्ही गोष्टी घडल्या. स्वर्गीय वसंतराव काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त एक दिवशी साहित्य संमेलन घेऊन वाचन चळवळीला प्रोत्साहन देण्याचे काम करत आहे, या माध्यमातून नवीन साहित्यिकांनी लेखक निर्माण करण्याचे काम करत आहे. ग्रंथालय चळवळी पुढे आव्हाने असले तरी ती पेलण्याची ताकद आपण निर्माण करून वाचन संस्कृती टिकली पाहिजे, यासाठी प्रयत्न करून चळवळ पुढे आली पाहिजे, असे आमदार काळे यांनी सांगितले. यावेळी कुंडलीक अतकरे, मिलिंद दुसाने यांनी वाचन संस्कृती वाढली पाहिजे त्यासाठी वाचन ची सवय महत्त्वाची आहे दर्जेदार साहित्य निर्मिती होऊन ती लोकांपर्यंत गेले पाहिजे अशी त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना डॉक्टर धर्मराज वीर म्हणाले की ग्रंथालय चळवळीचा प्रचार प्रसार व्हावा ग्रंथ आणि ग्रंथाचा दर्जा याचा विचार झाला पाहिजे सोशल मीडियाचा परिणाम वाचन चळवळीवर झाला असला तरी आजच्या युगात प्रिंट मीडिया टिकून आहे दररोज जवळपास सात हजार पुस्तकाची निर्मिती होते. डिस्काउंट मागे न लागता दर्जेदार पुस्तके कसे निर्माण होतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत गावागावात वाचन संस्कृती वाढली पाहिजे यासाठी ग्रंथालयाने प्रयत्न केले पाहिजेत परंतु ग्रंथालयाला मिळणारे अनुदान याचा विचार करता शासनाने ग्रंथालयाच्या अनुदान वाढवले पाहिजे. ग्रंथालय कर्मचारी कमी मानधनात काम करतात त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षा करणे कितपत योग्य असल्याचे डॉ. वीर म्हणाले. या दोन दिवशी ग्रंथोत्सवाच्या समारोप प्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी सर्वांचे आभार मानले.




# लभाण तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्सवात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**मुलचेरा :** बंजारा समाजाचे आराध्या दैवत, संत सेवालाल महाराज हे थोर मानवतावादी संत होते. क्रांतिसिंह संत सेवालाल महाराज शूरवीर लढवय्या बंजारा समाजाचे सतगुरू आहेत.

क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा 285 व्या जन्मदिनी निमित्त दिनांक १५ फेब्रुवारी रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मूलचेरा तालुक्यात येत असलेल्या लबानतांडा येथील बंजारा बांधवानी येथील संत सेवालाल महाराजांचे मंदिर ठिकाणी जयंती उत्सव कार्यक्रम आयोजित केली. आविसं काँग्रेसचे नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांनी जयंती कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दर्शवून या'कार्यक्रमाला मार्गदर्शन केले.सर्व प्रथम संत सेवालाल महाराजांचे दर्शन घेऊन कार्यक्रमाला सुरुवात केली.त्यावेळी कंकडालवार यांनी येथील बंजारा समाज कडून शाल श्रीफळ देऊन सत्कार करत पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

संत सेवालाल महाराज यांची जयंती कार्यक्रम मोठ्या उत्सवात पार पाडले.

जयंती कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना येथील बंजारा बांधवांनी येथील प्रत्येक समस्या माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या समोर मांडले होते.

येथील प्रमुख समस्या म्हणजे लबानतांडा येथील बंजारा बांधवानी संत सेवालाल महाराजांचे मंदिर बांधकाम सुरु केली. मंदिर अर्धवट झाले होते.पुढील बांधकाम करण्यासाठी येथील बंजारा समाज बांधवांनी अडचण भासत होती. ही अडचण अजय कंकडालवार यांना सांगताच तात्काळ मंदिरसाठी मेटेरियल तसेच रोख रक्कम देऊन आर्थिक मदत केली आहे. त्यावेळी अजय कंकडालवार यांनी येथील नागरिकांना सांगितले की 'ही एकच समस्या नाही आपल्या गावातील प्रत्येक समस्यांचे निराकरण करण्यात येईल अशे नागरिकांना आश्वासन दिले आहे.त्यावेळी बंजारा बांधवानी तसेच येथील समस्त नागरिकांनी कंकडालवार यांचे आभार मानले आहे. त्यावेळी सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक तथा आदिवासी काँग्रेस सेलचे जिल्हा अध्यक्ष हणमंतू मडावी यांनी सुद्धा या कार्यक्रमाला मार्गदर्शन करून आर्थिक मदत केली आहे.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित भापकर पोलीस निरीक्षक मुलचेर, चल्लावार, अशोक येलमुले माजी सरपंच वेलगुर, प्रमोद, कमलेश सरकर, कन्नाके ग्रामपंचायत सदस्य, बानेव, याकब बानुके, गिरमा चव्हाव माजी सरपंच, चीना धूगलेत, रामुलु भुक्या, काशिराम धुगलोत, सुनीता बानोत, बोरकुटे, मरपल्लीचे माजी उपसरपंच कार्तिक तोगम, प्रमोद गोडसेलवार, सचिन पंचार्यासह बंजारा समाजाचे नागरिक तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आदिवासी गोवारी समाजासाठी समाज मंदिर

## माजी आ. दीपकदादा आत्राम यांच्याकडून मदत

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**मूलचेरा :** मूलचेरा तालुक्यातील मलेझरी येथे आदिवासी गोवारी समाज बांधव मोठ्या संख्येने आहे,समाजाची प्रगती करायची असेल तर समाज बांधव एकत्र येऊन चर्चा करण्यास स्वतःची हक्काची एक समाजमंदिर असायला हवी अशी समाजातील जेष्ठ व्यक्तींनी बैठक घेऊन समाजमंदिराचे बांधकाम लोकवर्गणीतून करण्याचे ठरविले.

आदिवासी गोवारी समाजमंदिर बांधकामाची माहिती आदिवासी विद्यार्थी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी भारत राष्ट्र समितीचे नेते, आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष तथा माजी आमदार दिपकदादा आत्राम यांना माहिती देताच आलापल्ली येथील निवासस्थानी समाज बांधवांना बोलावून मलेझरी येथे आदिवासी गोवारी समाजबांधवासाठी भव्य समाजमंदिर बांधकामासाठी आर्थिक मदत दिले.व भविष्यात आपल्या समाजाच्या प्रत्येक कार्यासाठी मी मदत करण्यास तयार असल्याचे आश्वासन दिले.

समाजमंदिर बांधकामासाठी आर्थिक मदत केल्याने आदिवासी गोवारी समाजबांधवांनी माजी आमदार दिपकदादा आत्राम यांचे आभार मानले. या वेळी गोवारी समाज अध्यक्ष विलासजी राऊत, आविस सल्लागार रामचंद्रजी शेडमाके, रामदास कोसनकार, आकाश नागोसे, सचिन राऊत, राहुल लोहट, आकाश राऊत, लक्ष्मण राऊत, राम राऊत, तुळशीदास नेवारे, गणेश नेव्हारे, शरद ठाकूर, मारोती नेवारे, निफुल गायकवाड, शंकर खंडारे, सुरेंद्र नागोसे, प्रणय शेडमाके, शेखर पोरेते, स्वप्नील सुरपामसह समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शेतकऱ्यांनी पीएम किसान सन्मान निधी योजनेची ई-केवायसी करून घ्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** २०१९ साली सुरु झालेली पीएम किसान सन्मान निधी योजनेत ११ कोटी शेतकऱ्यांना वार्षिक ६ हजार कोटी रुपये सरळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केले जातात. केंद्र सरकारने १ डिसेंबर २०२३ ते १५ जानेवारी २०२४ पर्यंत विशेष अभियानांर्तग ५० लाख शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण केली आहे. ह्यानंतर सुद्धा ७६ लाख असे शेतकरी आहेत कि, जे ह्या योजनेसाठी पात्र आहेत पण त्यांनी काही आवश्यक अटी पूर्ण केल्या नाहीत त्यामुळे अनेक शेतकरी पीएम किसान योजनेपासून वंचित आहेत. याबाबत सीएससीचे सीईओ संजय राकेश यांनी माहिती दिली कि, सीएससीने नेहमी ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचविण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. शेतकरी व शेती हे पहिले प्राधान्य असून देशातील ग्रामीण भागात असलेल्या सीएससी नेटवर्कच्या माध्यमातून सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांना टेली परामर्श, पीक विमा, ई-पशु चिकित्सा, किसान क्रेडिट कार्ड व पीएम किसान योजनेच्या मार्फत विविध सेवा पुरवीत आहोत. आमचे व्हीएलई देशभरातील शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ देत आहेत. काही शेतकऱ्यांना त्यांचा हप्ता मिळत नाही. हा लाभ न मिळण्याचे प्रमुख दोन कारण आहेत पहिले ई-केवायसी नसणे दुसरे बँक खात्याशी आधार लिंक नसणे ह्या दोन समस्यांसाठी १२ ते २१ फेब्रुवारी पर्यंत विशेष अभियान राबवित आहोत. यानुसार सीएससी चालकांमार्फत प्रत्येक गावात शिबीर आयोजित करून समस्यांचे समाधान करणार असून कुठलाही शेतकरी मागील हप्त्यांपासून वंचित राहिलाअसेल तर त्यालाही जुने हप्ते मिळणार आहेत तरी कळवण तालुक्यातील शेतकऱ्यांनी ई-केवायसी करण्यासाठी सरकार ऑनलाईन सर्व्हिसेस मेनरोड कळवण येथे भेट द्यावी व आपले समाधान करून घेण्याचे आवाहन नाशिक डिस्ट्रिक्ट मॅनेजर पवार यांनी केले.

# वाहन अडवून जबरीने २७ लाख रोख पळविले

## अंढेरा ते धोत्रा शिवारातील थरार, अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** कार अडवून चालक व फिर्यादी हात बांधून अज्ञात सात ते आठ व्यक्तींनी राजुरी स्टील कंपनी मालकाचे दुकानदाराकडून वसूल करून आणलेले २७ लाख रुपये रोख गाडीतून जबरी चोरून नेल्याची घटना १४ फेब्रुवारी रोजी रात्री अंढेरा ते धोत्रा नंदई शिवार दरम्यान घडली. याबाबत पोलिसांनी अज्ञात सात ते आठ जणांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला.

याबाबत अंढेरा पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार फिर्यादी हे जालना येथील राजुरी स्टील कंपनीचे दुकानदारांकडून वसूल करून आणलेले २७ लाख रोख रुपये वाहन क्रमांक एम.एच २१ बी.व्हि ७१६७ ने जालना कडे येत होते.रात्री नऊ वाजे दरम्यान अंढेरा घाटात एक पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ व एक पांढरा रंगाची स्विफ्ट डिझायर ने त्यांची गाडी थांबवून ७ ते ८ अनोळखी व्यक्तींनी गाडीचे चालकास खाली उतरवून गाडीत बसविले व फिर्यादी असलेल्या गाडीत ४ व्यक्ती बसले, त्यांनी चाकूचा धाक दाखवून गाडी धोत्रा नंदई शिवारात एका शेतात नेले व फिर्यादी आणि चालकास पाठीमागे हात बांधून घेऊन वसूल करून आणलेले रोख २७ हजार रुपये गाडीतून काढून जबरीने चोरून नेले. याबाबत रामेश्वर शिवप्रसाद श्रीमाली वय ४६ रा.पंचमुखी हनुमान मंदिर मोदीखाना जालना यांच्या फिर्यादीवरून अंढेरा पोलिसांनी अज्ञात सात ते आठ चोरट्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला. सदर प्रकरणात तपास अधिकारी ठाणेदार विकास पाटील यांनी बुलढाणा येथून श्वान पथक बोलावून घटनास्थळाची पाहणी केली.

**अंढेरा हद्दीत वाढली गुन्हेगारी : ठाणेदार**
विकास पाटील रुजू झाल्यापासून अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारीत वाढ झाली असून पंधरा दिवसांपूर्वी एका अज्ञात महिलेस जाळून खून करण्यात आला होता .सदर प्रकरणात अद्याप पर्यंत पोलिसांना कुठलाच सुगावा हाती लागला नाही . त्यातच काल राष्ट्रीय महामार्गावर घडलेल्या जबरी चोरीच्या ह्या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे .





# लिहा जहागीर येथे 'भाजपाचे घर चलो'

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लिहा जहागीर येथे भारताचे पंतप्रधान माननीय जी यांनी १० वर्षांत देशात उभे केलेले काम, महाराष्ट्राचा झालेला विकास, राज्य सरकारच्या यशोगाथा व कल्याणकारी योजनाची माहिती सामान्य जनतेला व्हावी यासाठी भाजपाकडून र चलो अभियान' राबविले जातत आहे. त्यादृष्टीकोनातून आज तालुका उपाध्यक्ष राम बनसोड हे लिहा जहागीर बुथ क्रमांक- 27 ला प्रवासी कार्यकर्ता म्हणून घरोघरी जाऊन जनतेशी संवाद साधला. यावेळी नागरिकांना केंद्र व राज्य सरकार राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. त्याबरोबर या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशीही संवाद साधत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या विशेष योजनांची माहिती विस्तारपूर्वक समजावत त्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष योगेश भाऊ मिसाळ, भाजपा तालुका उपाध्यक्ष तथा सुपर वॉरियर्स राम बनसोड, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक भाऊ जाधव, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका कोषाध्यक्ष भगवान भाऊ निराशे, सुनील शेवाळे, विकी प्रधान, साहिल गंगावणे, लिहा बुथ प्रमुख समाधान पाटील नवले, किसान मोर्चा तालुका चिटणीस कारभारी बनकर, उपसरपंच ज्ञानेश्वर निकम, ग्रा.प.सदस्य आन्ना मैंद, सुधाकर पवार, सोमनाथ रसाळ, जिंदराज फुंड, गणेश रसाळ, राजु वाघ, मच्छिंद्र नवले, देविदास म्हस्के, विठ्ठल बनकर सह गावातील भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूनम आघाव सुवर्ण पदकाने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**देऊळगाव राजा :** येथील समर्थ कृषी महाविद्यायातील विद्यार्थ्यांनी पुनम आघाव हीस कृषी विद्यापीठाच्या ३८ व्या दीक्षांत समारंभात तीन सुवर्ण, एक रोप्य व दोन रोख अशा एकूण सहा पदकाने सन्मानित करण्यात आली.

गत सात वर्षापासून अ दर्जा प्राप्त समर्थ कृषी महाविद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षणा करिता सर्व दूर प्रसिद्ध आहे. याचेच फलित म्हणून महाविद्यालयाची विद्यार्थीनी पुनम आघाव हिला 38 व्या दीक्षांत समारंभात डॉ पंजाबराव देशमुख मेमोरियल सुवर्णपदक, श्रीमती विमलाबाई देशमुख रोप्य पदक, स्व रेणुराव उर्फ अण्णासाहेब पाटील सुवर्णपदक, स्व गजानन पिंपरीकर मेमोरियल सुवर्णपदक, रोटरी इंटरनॅशनल डिस्टिक नंबर 314 बेस्ट युनिव्हर्सिटी स्टुडन्ट, मेहेरे बंधू रोख पारितोषिक बहाल करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, शिक्षण संचालक डॉ. श्याम सुंदर माने व कुलसचिव सुधीर राठोड यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत पूनम आघाव हिने आपल्या यशाचे श्रेय समर्थ कृषिमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन मेहेत्रे व सर्व प्राध्यापक वृंद यांना दिले.
यावेळी विद्यापीठातुन प्रथम आल्या बद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष देवानंद कायंदे, सचिव नंदाताई कायंदे, सहसचिव मनोज कायंदे, कोषाध्यक्ष सतीश कायंदे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, प्रा नारायण बोडखे, प्रा. मोहजीतसिंह राजपूत, प्रा. विलास सातपुते, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले. या दीक्षांत समारंभ प्रसंगी संपूर्ण विदर्भातील कृषी व संलग्न शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.



# शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा येथील आदर्श प्राथमिक माध्यमिक, उच्चमाध्यमिक व ग्रामगीता माध्यमिक शाळेच्या वतीने आडगाव येथे शिवजयंती उत्सव निमित्त विविध कार्यक्रम गावात साजरे करण्यात आले. शाळेचे अध्यक्ष काशिनाथ जाधव व सरपंच यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अहिल्याबाई होळकर, गणपती मंदिर येथे हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.
शाळेतील मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर छोटीशी नाटिका सादर केली, लहान लहान मुलांनी वेशभूषा केली, तसेच गावात लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. गावकऱ्यांनी मोठ्या आनंदात या मिरवणुकीचे व लेझीम पथकाचे स्वागत केले.विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय असे अनेक घोषणांनी परिसर दुमदुमले होते. या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच पार्वती चव्हाण,मा.उपसरपंच भाऊसाहेब धोंडकर,पत्रकार शुभम जगताप ,मा.तंटा मुक्ती अध्यक्ष कैलास जगताप, मा.सरपंच साईनाथ भूमे, पंडित मगर, सुधाकर भूमें, देवराव भूमें, हरिभाऊ धोंडकर,दत्तू शिंदे, आबासाहेब धोंडकर,धोंडीबा गवरे, अजिनाथ जगताप,सूर्यभान शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, ईश्वर भूमें,दीपक काळे, भरत भूमें, भगवान धोंडकर, सुमित पंडित,योगेश चव्हाण,बाबासाहेब शिंदे,अंकुश जगताप,राजू जगताप, दिलीप भूमें,योगेश भुमे,काकराव जगताप, शेनफडू शिंदे आदी उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक योगेश काशिनाथ जाधव व शिक्षक वृंदांनी मानले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर